शनिवार, ४ फेब्रुवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १९७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गासाठी जमीन अधिग्रहणाला वेग/२
रायगड पोलीस दलाच्या इतिहासाचा पट उलगडणार/५
आता लढत 'कांगारू'शी; टीम इंडिया होतेय सज्ज/८

## 'खेलो इंडिया'त महाराष्ट्राचा खो-खो संघ चॅम्पियन



**भोपाळ :** महाराष्ट्राचा खो-खो संघ खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरला आहे. यासह महाराष्ट्राने आपले निर्विवाद वर्चस्व राखत सलग पाचव्यांदा चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकाविला आहे. महाराष्ट्राच्या संघाने शुक्रवारी (दि. ३) अंतिम फेरीत दिल्ली संघाला ३८-२८ अशी धूळ चारली. युवा कर्णधार नरेंद्र कातकडे, आदित्य कुडाळे आणि निखिल यांनी सर्वोत्तम अष्टपैलू कामगिरी करीत सोनेरी यशाची घोडदौड कायम ठेवली, तर महाराष्ट्राचा महिला खो-खो संघ रौप्यपदकाचा मानकरी ठरला. महिलांच्या संघाला अंतिम फेरीत ओडिशाविरुद्ध १६-१३ने निसटत्या पराभवाचा सामना करावा लागला. या संघाने ओडिशाला कडवी झुंज दिली आणि रौप्यपदक पटकाविले. या दोन्ही संघांचे अभिनंदन होत आहे.

### मराठी साहित्य संमेलनाचे शानदार उद्घाटन

# संमेलनाध्यक्षांना राज्य अतिथीचा दर्जा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**वर्धा : प्रतिनिधी**

मराठी भाषेसाठी साहित्यिकांनी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही. आज इथे जमलेली गर्दी ही साहित्यावर प्रेम करणाऱ्यांची आहे. ज्याप्रमाणे वारकरी पंढरीची वारी करतात त्याचप्रमाणे साहित्यावर प्रेम करणारे रसिक या ठिकाणी येतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ३) येथे केले. या वेळी त्यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांना राज्य अतिथींचा (स्टेट गेस्ट) दर्जा देण्यात येत असल्याची घोषणा केली.

विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्धा येथील आचार्य विनोबा भावे सभामंडपात प्राचार्य राम शेवाळकर



व्यासपीठावर आयोजित साहित्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष न्या. नरेंद्र चपळगावकर, शालेय शिक्षण तथा मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, पूर्वाध्यक्ष भारत सासणे, स्वागताध्यक्ष माजी खासदार दत्ता मेघे, साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी, प्रसिद्ध हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष प्रदीप दाते आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, आज साहित्य नगरी या ठिकाणी सजली आहे. साहित्याची पंढरी असे या ठिकाणाचे वर्णन केले तर वावगे ठरणार नाही. तीन दिवसांचे हे साहित्य संमेलन आहे. या ठिकाणी साहित्याचा जागर होत आहे. त्यासाठी मी शुभेच्छा देतो. खरे म्हणजे साहित्य संमेलनात राजकारण्यांचे काय काम? त्यामुळे मी या कार्यक्रमात एक साहित्य रसिक म्हणूनच आलो आहे. आम्ही या कार्यक्रमात पाहुणे म्हणून आलो आहोत. कुठेही सरकारचा हस्तक्षेप या कार्यक्रमात असणार नाही.

मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांनी, साहित्यिक हे समाजाची ज्योत आहेत. ही ज्योत तेवत ठेवण्यासाठी राज्य शासन सदैव पाठिशी आहे, अशी ग्वाही दिली. इतर मान्यवरांचीही या वेळी समयोचित भाषणे झाली.

# राष्ट्रवादीने २००४मध्ये मुख्यमंत्रिपद सोडणे सर्वांत मोठी चूक होती!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात २००४ साली राष्ट्रवादी काँग्रेसकडे सर्वाधिक जागा असूनही मुख्यमंत्रिपदावर पाणी सोडणे ही सर्वांत मोठी चूक होती. कुणालाही मुख्यमंत्री केले असते तरी चालले असते, असे विधान राष्ट्रवादीचे नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी एका मुलाखतीमध्ये केले आहे. त्यामुळे चर्चा सुरू झाली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रमुख पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला स्थापनेपासून आजपर्यंत राज्याचे मुख्यमंत्रिपद मिळविता आलेले नाही. २००४ साली विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी हा सर्वांत मोठा पक्ष ठरला होता, मात्र तेव्हा हातातोंडाशी आलेली मुख्यमंत्रिपदाची संधी पक्षाने दवडली. यावर आता राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी मुलाखतीमध्ये भाष्य केले. एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, एक मोठी चूक वाटते ती म्हणजे २००४ साली मुख्यमंत्रिपद सोडायला नको होते. आर. आर. पाटील, छगन भुजबळ यांना मुख्यमंत्री



### विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे विधान

करायचे होते किंवा आमच्या वरिष्ठांच्या मनात कोण होते त्यांना मुख्यमंत्री करायचे होते, पण २००४ला जर मुख्यमंत्रिपद राष्ट्रवादीकडे आले असते तर टर्मच्या शेवटपर्यंत बदल होऊ दिला नसता.

या वेळी २००४मध्ये राष्ट्रवादीच्या जागा अधिक होत्या, तरी मुख्यमंत्रिपद न घेण्याचा निर्णय कुणी घेतला हा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले की, आम्ही तेव्हा ज्युनियर होतो. (पान २ वर..)

# कर्मवीरांच्या शिक्षण प्रणालीत समाज घडविण्याची ताकद -लोकनेते रामशेठ ठाकूर

## महात्मा फुले महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे समाजाच्या जडणघडणीमध्ये मोठे योगदान आहे. त्यांच्या शिक्षण प्रणालीत समाज घडविण्याची ताकद आहे. त्यांचाच वारसा घेऊन आपण पुढे वाटचाल केली तर लवकरच आपला देश महाशक्ती म्हणून उदयास येऊ शकतो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ३) केले. ते पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अध्यक्षीय भाषणात बोलत होते.



या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, रायगड विभागाचे निरीक्षक रोहिदास ठाकूर, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटील, डॉ. नरेश मढवी, जिमखाना चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, विद्यार्थी परिषद अध्यक्ष स्नेहल पाटील व मनीष पेटकर, सांस्कृतिक विभाग चेअरमन प्रवीण गायकर, कार्यवाह डॉ. पराग पाटील, वाणिज्य विभाग इन्चार्ज डॉ. विलास विशे, कला विभाग इन्चार्ज पोशा ठाकूर, विज्ञान विभाग इन्चार्ज भरत अंबवडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर सेवकवर्ग, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्था व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांमुळेच आपण घडलो, अशी कृतज्ञता या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली, तसेच महात्मा फुले महाविद्यालयाने प्राप्त केलेल्या स्टार कॉलेजच्या दर्जाचे कौतुक करीत महाविद्यालयास उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या व महाविद्यालयास ए+चा दर्जा निश्चित मिळू शकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. (पान २ वर..)

## निवडक

### मुंबईवर दहशतवादी हल्ल्याची धमकी; 'एनआयए'ला ई-मेल

**मुंबई :** मुंबईवर दहशतवादी हल्ला होणार असल्याचा ई-मेल राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) प्राप्त झाला असून या हल्ल्याची माहिती मुंबई पोलीस व दहशतवादविरोधी पथकाला देण्यात आली आहे. या ई-मेलमध्ये तालिबानी संघटनेचा प्रमुख नेता सिराजुद्दीन हक्कानीच्या नावाचाही उल्लेख करण्यात आला आहे. यानंतर सर्व सुरक्षा यंत्रणांना सावध करण्यात आले असून हा ई-मेल कुठून आला व तो पाठवणारी व्यक्ती कोण आहे याचा तपास पोलिसांकडून सुरू करण्यात आला आहे.

### आज सादर होणार मुंबई मनपाचा अर्थसंकल्प

**मुंबई :** देशातील सर्वांत श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबई महापालिकेचा २०२३-२४चा अर्थसंकल्प शनिवारी (दि. ४) सादर केला जाणार आहे. मुंबई महापालिकेच्या इतिहासात दुसऱ्यांदा प्रशासक म्हणून आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यासाठी मुख्यमंत्र्यांनी बीएमसी आयुक्तांना विशेष सूचना केल्या आहेत.



**पनवेल : आसामची राजधानी गुवाहाटी येथे झालेल्या नवव्या राष्ट्रीय थाई-बॉक्सिंग फेडरेशन कप स्पर्धेत प्रथम निलकंठ बहिरा, पल्लवी अशोक कणसे व राजा लुकास नाडार यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. याबद्दल भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, शिक्षक प्रतिक कारंडे, निलकंठ बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा उपस्थित होते.**

### दहावीच्या परीक्षेचे हॉल तिकीट सोमवारपासून मिळणार

**मुंबई :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे हॉल तिकीट ६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजल्यापासून ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. सर्व माध्यमिक शाळांनी दहावी बोर्ड परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीट प्रिंट करून द्यायचे आहे.

हॉल तिकीट प्रिंट करून देताना त्यासाठी कुठलेही शुल्क आकारू नये. सोबतच प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकाचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी, अशा सूचना बोर्डाने केल्या आहेत.

# महाड नगरपालिकेच्या कचरा विघटन प्रक्रिया केंद्राला आग



(छाया : महेश शिंदे)

### सुमारे २५ लाखांचे नुकसान

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषदेच्या लाडवली येथे असणाऱ्या कचरा विघटन प्रक्रिया केंद्राला शुक्रवारी (दि. ३) पहाटे वणव्यामुळे आग लागली. या आगीत केंद्रातील कचऱ्यासह त्यावर करायवच्या प्रक्रियेच्या यंत्रसामग्रीचे सुमारे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

महाड शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या लाडवली गावामध्ये पालिकेचे ओला व सुका कचरा विघटन प्रक्रिया केंद्र आहे. या ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण व विघटन करून त्याची विल्हेवाट लावली जाते. सुमारे पाच टन क्षमता असणाऱ्या या प्रक्रिया केंद्राच्या एका युनिटला शुक्रवारी सकाळी साडेपाच वाजता वणव्यामुळे आग लागली. शेजारच्या माळरानावर पेटत आलेला वणवा या प्रक्रिया केंद्रामध्ये शिरल्याने वर्गीकरण करून ठेवण्यात आलेल्या सुमारे तीन टन सुका कचऱ्याने पेट घेतला.

कचरा पेटल्यानंतर ही आग वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात वाढली व प्रक्रिया केंद्राच्या इतर भागांतदेखील पसरली. कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सुमारे तीन यंत्रसामग्री यामध्ये जळल्या. त्यामुळे नगरपालिकेचे सुमारे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीची घटना कळताच पालिकेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, स्वच्छता व आरोग्य विभागाचे अभियंता परेश साळवी, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख गणेश पाटील व पालिकेचे अग्निशामक दल घटनास्थळी तातडीने रवाना झाले. सुमारे पाच तास प्रयत्न करून ही आग विझविण्यात आली.

# महाडजवळ केमिकल टँकर उलटला; महामार्गावरील वाहतूक ठप्प

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीत केमिकल घेऊन येणारा टँकर शुक्रवारी (दि. ३) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर दासगाव हद्दीत उलटला. त्यामुळे महामार्ग तीन तास ठप्प झाला होता. महामार्ग वाहतूक पोलीस आणि महाड शहर पोलीस यांच्या अथक प्रयत्नानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.



तारापूर एमआयडीसीतील लुपिन लिमिटेडमधून महाड एमआयडीसीमधील जेट इन्सुलेशन प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यासाठी स्पेनट ऑरगॅनिक सोलव्हन्ट घेऊन येणारा टँकर (एमएच ०४ बीजी ८१३) शुक्रवारी सकाळी १० वाजता मुंबई-गोवा महामार्गावर दासगाव हद्दीत एका वळणावर उलटला. त्यामुळे टँकरमधील केमिकल रस्त्यावर पसरले. पोलीस व अग्निशमन दलाने टँकर सुरक्षित बाजूला करीत तीन तासांनी वाहतूक पूर्ववत केली.

# मुंबई-पुणे वंदे भारत ट्रेनची चाचणी

## कर्जतमध्ये प्रवाशांनी व्यक्त केला आनंद



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प मांडताना मुंबई-पुणेदरम्यान वंदे भारत रेल्वेगाडी चालविण्यात येईल, अशी घोषणा केली होती. पूर्ण वातानुकूलित आणि हायस्पीड ट्रेनसारखा लूक असलेल्या वंदे भारत गाडीची लगोलग पुणे-मुंबईदरम्यान चाचणी घेण्यात आली.

मध्य रेल्वे प्रशासनाने मुंबई आणि पुणे मार्गावरील प्रवाशांना सुखद धक्का दिला आहे. या मार्गावर अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या वंदे भारत ट्रेनची गुरुवारी (दि. २) ट्रायल घेण्यात आली. पुणे ते मुंबई अशी ही गाडी धावेल. त्या वेळी कर्जत रेल्वेस्थानकात उभ्या असलेल्या प्रवाशांना आपण परदेशात आहोत काय असे काही वेळ वाटले.

साडेतीन तासांत मुंबई ते पुणे हे अंतर पार करणाऱ्या वंदे भारत ट्रेनचा लूक बघून अनेकांनी तोंडात बोट घातले, कारण पूर्णपणे भारतीय बनावटीची असूनदेखील अनोखी अशी ही रेल्वेगाडी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. ही गाडी बघून सर्व प्रवाशांनी आनंद व्यक्त केला, तसेच या मार्गावरील अनेक गावांतील लोक आणि रस्त्याने जाणारे वाहनचालकदेखील कुतूहलाने गाडीकडे पाहत होते.

# आंगणेवाडीत आज उपमुख्यमंत्र्यांची सभा

**मालवण : प्रतिनिधी**



कोकणातील मालवणमधील प्रसिद्ध अशा आंगणेवाडीच्या भराडी देवीची यात्रा शनिवारी (दि. ४) आहे. याच यात्रेचा मुहूर्त साधत भाजप आंगणेवाडीत जाहीर सभा घेणार आहे. भराडी देवीच्या यात्रेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे आंगणेवाडीमधील माळरानावर भाजपने त्यांची भव्य जाहीर सभा आयोजित केली आहे.

महाराष्ट्रातीलच नव्हे; तर देश-परदेशात कोकणातील ज्या जत्रेचे आकर्षण आहे ती म्हणजे आंगणेवाडीची जत्रा. दरवर्षी लाखो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात या देवीची जत्रा रंगते. आंगणेवाडीतल्या भराडी देवीच्या यात्रेला मुंबईतून मोठ्या संख्येने चाकरमानी दाखल होत असतात. त्यासोबतच विविध पक्षांचे राजकीय नेते या यात्रेत सहभागी होतात. 'सिंधुदुर्ग बदलतोय, सिंधुदुर्ग स्थिरावतोय' या टॅगलाईनवर ही जाहीर सभा होत असून या सभेतून भाजप शक्तिप्रदर्शन करणार आहे.

# सत्यजित तांबे स्पष्ट करणार भूमिका

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार शुभांगी पाटील यांना पराभूत करून अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे यांनी विजय मिळविला आहे. काँग्रेसशी मतभेद झाल्यानंतर तांबे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला होता. त्यामुळे आता आमदार बनलेले सत्यजीत पुढे काय भूमिका घेणार याची उत्सुकता सगळ्यांना लागली आहे. अशात त्यांनी मी ४ तारखेला माझी भूमिका स्पष्ट करेन, असे निकालानंतर जाहीर केलेय.

सत्यजित तांबे यांच्या बंडखोरीनंतर त्यांच्यावर पक्षाकडून कारवाई होण्याबाबत बरीच चर्चा रंगली होती. एकीकडे सत्यजित यांच्या भाजप प्रवेशासाठी सकारात्मक असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले आहेत, तर दुसरीकडे



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीदेखील सत्यजितबाबतचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील, असे विधान केले आहे. त्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

प्रचंड राजकीय उत्सुकतेच्या ठरलेल्या या निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर नवनिर्वाचित आमदार म्हणून सत्यजित तांबे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मतांची टक्केवारी कमी झाली. सोमवारचा दिवस वर्किंग डे होता. अनेक लोक मतदानासाठी येऊ शकले नाहीत. त्यामुळे अपेक्षेपेक्षा कमी मते आहेत, पण मिळालेल्या यशामुळे आम्ही समाधानी आहोत. आमच्या परिवाराने कायम राजकारण निवडणुकीपुरते केले आहे. निवडणुकीनंतर आम्ही सगळ्यांना सोबत घेऊन चालण्याचे काम केले आहे. त्यामुळे सगळ्याच पक्षाचे लोक आम्हाला मदत करीत असतात, असे ते म्हणाले.

माझ्या वडिलांनी गेल्या १४ वर्षांपासून या मतदारसंघात कामाच्या, जनसंपर्काच्या माध्यमातून जनतेची मने जिंकण्याचे काम केले. हाच ऋणानुबंध पुढे नेण्याचे काम मी करेन. सर्वच राजकीय प्रश्नांच्या बाबतीत मी ४ तारखेला माझी भूमिका स्पष्ट करेन, असे या वेळी सत्यजित तांबेंनी नमूद केले. त्यामुळे ते नेमके काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गासाठी जमीन अधिग्रहण कामाला वेग

## ना. कपिल पाटील यांची माहिती; रेल्वे मंत्रालयाची अंतिम मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गासाठी रेल्वे मंत्रालयाने अंतिम मंजूरी दिली असून, जमीन अधिग्रहणाचे काम तातडीने सुरू करण्यासाठी रेल्वे बोर्डाकडून मध्य रेल्वे प्रशासनाला पत्र पाठविण्यात येणार आहे. तर ८० टक्के जमीन ताब्यात आल्यानंतर मुरबाड रेल्वेमार्गासाठी निविदा काढण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी आज येथे दिली.

पहिल्या टप्प्यातील कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गानंतर दुसर्‍या टप्प्यात मुरबाड ते नगर आणि मुरबाड ते पुणे असे दोन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची मागणी रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. त्याबाबतही रेल्वेमंत्र्यांनी शाश्वत केले, असे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सांगितले. भारतीय रेल्वेचे जनक नाना शंकरशेठ यांचे मुरबाड हे गाव आहे. मात्र, या गावाला रेल्वे पोचण्याचे



स्वप्न १७० वर्षांनंतर पूर्ण होणार आहे. अनेक वर्ष प्रयत्न केले जात होते. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच मुरबाड रेल्वेला हिरवा कंदील मिळाला. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेचा प्रस्ताव मंजूर केला. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेसाठी महाराष्ट्राच्या वाटा उचलण्यास मान्यता दिल्यामुळे रेल्वे प्रकल्प पूर्ण होणार आहे. याबद्दल आपण त्यांचे आवर्जून आभार मानत आहोत, असे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सांगितले.

जमीन अधिग्रहणासाठी रेल्वे मंत्रालयाकडून दोन दिवसांत मध्य रेल्वेला पत्र पाठविण्यात येईल. त्यानंतर जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू होईल. जमीन अधीग्रहण पूर्ण झाल्यानंतर रेल्वेची निविदा काढण्यात येईल. त्यानंतर या मार्गाचे काम सुरू करण्यात येईल, असे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. त्याचबरोबर या मार्गाच्या दुसर्‍या टप्प्यात मुरबाड ते नगर आणि मुरबाड ते पुणेपर्यंत दोन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची मागणी रेल्वेमंत्र्यांकडे केली. त्याबाबतही रेल्वेमंत्र्यांनी शाश्वत केले आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सांगितले.

कल्याण व मुरबाड तालुक्यातील सर्वपक्षीय नेते व लोकप्रतिनिधींना साथीला घेऊन सुमारे दीड महिन्यांत जमीन अधीग्रहण करण्याचा प्रयत्न आहे. सुमारे ८० टक्के जमीन अधीग्रहीत झाल्यावर निविदा काढता येईल. त्यानंतर काम होईल. मात्र, २०२४ पूर्वी काम सुरू होईल. या मार्गासाठी ९६० कोटी रुपये खर्च असून, राज्य सरकारकडून ५० टक्के खर्च उचलण्याची हमी देण्यात आली आहे, असे कपिल पाटील यांनी सांगितले.

### कल्याण स्टेशनचे सुशोभीकरण

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व ठाणे रेल्वे स्थानकाच्या धर्तीवर कल्याण जंक्शन रेल्वे स्थानकाचा विमानतळाप्रमाणे विकास व सुशोभिकरणाला मंजुरी मिळावी, यासाठी माझ्याबरोबरच खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सांगितले.**

# कोल्हापूर विभागाचे उपसंचालक डॉ. खराट यांना सेवानिवृत्तीपर निरोप



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शासकीय नोकरीत हल्ली संवादाचा अभाव निर्माण झाला आहे. संवादामुळे अनेक चांगले उपक्रम राबविता येतात, असे उद्गार कोल्हापूर विभागाचे उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांनी काढले. कोकण विभागीय माहिती कार्यालयात डॉ. संभाजी खराट यांच्या नियत वयोमानानुसार सेवा निवृत्ती नंतर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र. जिल्हा माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे, सहायक संचालक संजीवणी जाधव तसेच विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

उपसंचालक डॉ. मुळे म्हणाले, डॉ. खराट आणि माझा केवळ एक शासकीय अधिकारी म्हणून संबंध नव्हता तर आम्ही त्यापलीकडे मैत्रीपूर्ण ऋणानुबंध जपला आहे. आमच्या भेटीत कधीही शासकीय कामकाजा विषयी बोलणे नव्हते तर साहित्य, लिखाण, पर्यटण अशा विषयांवर बोलणे होत असे. डॉ. खराट यांनी शासकीय काळातील कार्यबाहुल्यातही वेळ काढून उत्तम लिखाण केले आहे, असे सांगून पुढील दीर्घआयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्र. जिल्हा माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे तसेच उपस्थित अधिकारी /कर्मचार्‍यांनी डॉ. खराट यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक संचालक संजीवणी जाधव यांनी केले.

डॉ. संभाजी खराट यांनी सहाय्यक संचालक, जिल्हा माहिती अधिकारी ते उपसंचालक अशा विविध पदांवर मंत्रालय, कोकण विभाग आणि कोल्हापूर विभाग या ठिकाणी काम केले आहे.

# कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची महापारेषणला भेट

## कार्यपद्धती आणि विविध उपक्रमांची घेतली माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौर्‍यानिमित्त भेट दिली. महापारेषण कंपनीचे कामकाज, कार्यपध्दती व जनसंपर्क विभागास भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरूवातीला जनसंपर्क विभागाला भेट दिली. प्रारंभी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांचे स्वागत केले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणने विविध उपक्रम कसे प्रभावीपणे राबविले आहेत, याची माहिती दिली. महापारेषण कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरून वीजवहन व वीजपुरवठा सुरळीत ठेवला आहे. त्यामुळे महापारेषणला कंपनीला विविध पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने कोरोना काळात व तौक्ते, निसर्ग चक्रीवादळात अधिकारी व कर्मचार्‍यांनी कसे सांघिक भावनेने काम केले, याबद्दल ध्वनिचित्रफित विद्यार्थ्यांना दाखविली. तसेच जनसंपर्क विभागाचे ऋमहापारेषण समाचारऋ मासिक, दैनंदिनी व दिनदर्शिकेविषयी माहिती दिली.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी महापारेषणची संपूर्ण यंत्रणा, मनुष्यबळ, कामकाज व कार्यपध्दतीची माहिती दिली. पत्रकारितेतील विद्यार्थ्यांनी भविष्यात सामान्य नागरिक केंद्रबिंदू मानून सकारात्मक पत्रकारिता करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक महेश आंबेकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या डॉ. सुमेधा साळुंखे, दीपक कुन्नुरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी आभार मानले.

### विद्यार्थी भारावले

**महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) व संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले सुसज्ज व सर्वसुविधायुक्त वाचनालय व व्यायामशाळा पाहून विद्यार्थी भारावले. महापारेषण भविष्यात ई-लायब्ररी सुरू करणार असल्याचे सांगताच पीएच.डी. करत असणारे विद्यार्थी दीपक कुन्नुरे यांनी हा उपक्रम खूपच स्तुत्य असून आपणही महापारेषणला दोन हजार रूपयांची पुस्तके मोफत देणार असल्याचे जाहीर केले.**

# कलेची सेवा करणार्‍यांचा गौरव करणे हा शासनाचा बहुमान

## भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवात मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन





**मुंबई : वृत्तसंस्था**

सांस्कृतिक क्षेत्र असे एकच क्षेत्र आहे जिथे कलाकारांनी सादर केलेल्या कलेतून उपस्थित प्रेक्षकांना उर्जा आणि उत्साह मिळतो. आज गौरविण्यात आलेल्या कलाकारांनी वर्षानुवर्ष सेवाभावी वृत्तीने काम करुन कलेची उपासना केली. या अशा कलाकारांचा गौरव करणे हा शासनाचा बहुमान असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार आणि संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रभादेवी येथील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे झाले. कार्यक्रमास शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रास्ताविक करताना श्री. खारगे यांनी येणार्‍या काळात सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध क्षेत्रातील कला आणि कलाकारांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. यावर्षी या विभागामार्फत विविध उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे.

### साहित्य संमेलनासाठी दोन कोटी रुपये अनुदान

**श्री. केसरकर यावेळी म्हणाले की, कला आणि साहित्य याना हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून हे राज्य शासन प्रयत्न करत आहे. उदयापासून साहित्य संमेलन सुरु होत असून या संमेलनासाठी ५० लाख ऐवजी २ कोटी अनुदान देण्यात येणार आहे. यशिवाय येणार्‍या काळात गिरगावातील चौपाटी येथे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. तर याच ठिकाणी ५०० आसनी अंबी थिएटर असणार आहे. तर नवी मुंबई येथील जागेत मुंबईत येणार्‍या साहित्यिक यांची रहाण्याची सोय केली जाणार आहे. यशिवाय वाई येथे विश्वकोश इमारत उभारण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग येथे यापूर्वी ३ नाट्यगृह बांधण्याचे काम पूर्ण झाले असून चौथ्या नाट्यगृह बांधण्याचे भूमीपूजन लवकरच केले जाईल.**

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार आणि संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कारांचे स्वरुप ५ लाख रुपये रोख, मानचित्र, सन्मानपत्र असे आहे. संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त कलाकारांचा सत्कारही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# अलिबाग हरे कृष्ण नामहट्ट केंद्राची पदयात्रा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

हरे कृष्ण नामहट्ट केंद्र, इस्कॉन अलिबागतर्फे दहावी पदयात्रा रविवारी सातिर्जे चोंढी पूल येथून सुरू झाली. सर्वप्रथम हरिश्चंद्र शिरधनकर यांच्या निवासस्थानाजवळ पदयात्रेचे स्वागत, पूजन, तेथील ग्रामस्थांनी केले. तेथून पुढे श्री गणेश मंदिर सातिर्जे येथे पदयात्रेचे स्वागत ग्रामस्थ आणि युवा नेतृत्व राजाभाऊ ठाकूर सपत्नीक पूजन केले. तेथून पदयात्रा पुढे निघाली वाटेत ग्रामस्थांतर्फे स्वागत, पूजन झाले.

देवीच्या मंदिरासमोर दर्शन घेण्यासाठी ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत सदस्य आले होते तेथून पुढे ग्रामपंचायत सरपंच माई खडपे सातिर्जे यांच्या हस्ते पदयात्रेचे पूजन आणि स्वागत झाले. त्यानंतर कातळपाडा येथे ग्रामस्थ व सदस्यांनी पूजन आणि स्वागत केले. तेथून पदयात्रा पुढे बोंबटकर पाडा येथे ग्रामस्थ व सदस्यांनी पूजन आणि स्वागत केले. तेथून परतीच्या मार्गावर पदयात्रा पुन्हा श्री गणेश मंदिर येथे येईल आणि दुपारी महाप्रसाद मंगला नार्वेकर यांच्या निवासस्थानी झाला. त्यानंतर पदयात्रा विसर्जित होऊन भक्त आपापल्या घरी निघून गेले. साधारण ८ किमी पदयात्रा झाली. ६६ भगवदगीता सेल झाला. पंचवीस भक्त यावेळी उपस्थित होते.



पान १ वरून

## राष्ट्रवादीने २००४मध्ये मुख्यमंत्रिपद सोडणे सर्वांत मोठी चूक होती!

निर्णय प्रक्रियेमध्ये बोलणारे कोण होते तर प्रफुल्ल पटेल, मधुकर पिचड, छगन भुजबळ, पद्मसिंह पाटील, विजयसिंह मोहिते-पाटील हे आमचे नेतेगण होते. त्यांनी सांगायचे आणि आम्ही जी म्हणायचे, अशी परिस्थिती होती.

मुख्यमंत्रिपदासाठी नशिबाची साथ आवश्यक असल्याचे मतही अजित पवार यांनी व्यक्त केले. आपण कितीही काही म्हटले तरी प्रयत्न करणे हे प्रत्येकाच्या हातात असते, पण कुठेतरी नशिबाचीही साथ लागते. सगळ्याच क्षेत्रात ती लागते, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, नाशिक पदवीधर मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोर नेते आणि अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे यांचा विजय, तर महाविकास आघाडीच्या उमेदवार शुभांगी पाटील यांचा पराभव झाला आहे. या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी तांबे यांना निवडणूक जिंकण्यासाठी राष्ट्रवादीने मदत केली, असे म्हटले आहे. पवार यांच्या या विधानानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. अजित पवार ही एक जबाबदार व्यक्ती आहे. ते अशा पद्धतीने बोलत असतील, तर या सगळ्या गोष्टीची चिंता आमच्याही मनात आहे. महाविकास आघाडीची बैठक झाल्यानंतर याबाबत आम्ही खुलासा करू, असे पटोले म्हणाले.

## कर्मवीरांच्या शिक्षण प्रणालीत समाज घडविण्याची ताकद -लोकनेते रामशेठ ठाकूर

संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे म्हणाले की, जिद्द, चिकाटी व जाज्वल्य इच्छाशक्ती असेल तर उरी बाळगलेली स्वप्ने साकारता येतात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांचा मागोवा घेत ते म्हणाले, स्वप्ने अशी पाहावीत की, जी आपणास झोपू देत नाहीत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीदेखील असेच स्वप्न पाहिले होते ते म्हणजे समाजाच्या शेवटच्या मुलाला शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी ते अहोरात्र झटले. त्याचाच परिणाम म्हणून आज रयत शिक्षण संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झालेला दिसतो आहे.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविकपर भाषणात रयत शिक्षण संस्था व महात्मा फुले महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेत उपस्थित पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला, तर वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे कार्याध्यक्ष डॉ. पराग पाटील यांनी महाविद्यालयाच्या सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर केला.


या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील ज्या अध्यापक व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर, तसेच जिल्हा व विद्यापीठ स्तरावर नैपुण्य प्राप्त केले त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व प्रा. शरयू नाईक यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार विद्यार्थी प्रतिनिधी स्नेहल ठाकूर हिने मानले.

### दुखवटा

## रामभाऊ कदम

**नागोठणे :** रायगड जिल्ह्यातील पाभरे-म्हसळा येथील मूळ रहिवासी रामभाऊ गणपत कदम यांचे बोरीवली मुंबई येथील राहत्या घरी ८२व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. कै. रामभाऊ कदम हे नातेवाईक व मित्र परिवारात बंधु नावाने परिचित होते. अतिशय प्रेमळ व मन मिळाऊ स्वभावाच्या बंधूंच्या पार्थिवावर बोरीवली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी लता कदम,मिलिंद व मंदार ही दोन मुले, माधुरी दिलीप जाधव व मनीषा चेतन जाधव या दोन विवाहित मुली तसेच सुना,जावई व नातवंडे असा परिवार आहे. दशक्रिया विधी गुरुवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्री क्षेत्र हरीहरेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य रविवार १२ फेब्रुवारी रोजी बोरीवली येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.




**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ३७ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून) ब - १ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील मुरुड राजपुरी खोकरी रस्त्यावरील प्रजिमा- ५५ कि.मी. १/८०८ मधील एकदरा गावाजवळील मोठ्या पुलाची संरचनात्मक दुरुस्ती करणे. | ३,९५,६८,१३७.०० |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०६/०२/२०२३ (स.१०.००) ते दिनांक २०/०२/२०२३ (सं.१८.००)
निविदापूर्व बैठक :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक १४/०२/२०२३ रोजी दु. ३.०० वा.
ई-निविदा उघडणे :- दिनांक २४/०२/२०२३ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां. / अवि/निविदा/ / २०२३**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१**
**दिनांक :-**

**सही/-**
**(ज.ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, अलिबाग, जि. रायगड**

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर जबरी चोरी

# सहा आरोपींना २४ तासांत अटक

## आठ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त



**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भाताण बोगद्याच्या अगोदर सहा जणांच्या अज्ञात टोळीने एका व्यक्तीस लाखो रुपयाला लुटल्याची घटना घडली. या प्रकारानंतर गाडी तेथेच सोडून ती टोळी पसार झाली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांनी या आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक केली आहे. त्यांच्याकडून गाडीसोबत एकूण आठ लाख १७ हजारांचा मुद्देमालही जप्त केला आहे.

आजिनाथ राख (वय ३७) हे पहाटेच्या सुमारास गाडीतून ठाण्याहून पुणेकडे जात असताना भाताण बोगद्याजवळ त्यांच्यामागे आलेल्या एर्टिगातील अनोळखी सहा जणांनी त्यांच्या गाडीला ठोकर मारल्याचा बहाणा करून गाडी जबरदस्तीने थांबवली. त्यानंतर आजिनाथ यांना मारहाण करून खालापूर फूड मॉल येथे घेऊन गेले व त्यांच्या गाडीत असलेली एक लाख ९७ हजार रुपये, ओपो कंपनीचा मोबाईल फोन व इतर ऐवज असा मिळून जवळपास दोन लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरिक्षक संजय गळवे, सपोनि पाळदे, पो.उप.नि आकाश पवार, पो.हवा. महेश धुमाळ, सुनील कुदळे, पंकज चंदिले, पो.ना. राकेश मोकल, पो.शि. आकाश भगत, भीमराव खताळ यांची पथके तयार करण्यात आली.

पथकाने प्रवासादरम्यानचे सर्व सीसीटीव्ही फुटेज चेक केले. टोलनाक्यावरून फास्टटॅग स्कॅनच्या मदतीने नमूद मोटार कारचा क्रमांक प्राप्त केला. त्यावरून फास्टटॅगधारकाचा मोबाईल क्रमांक मिळाला. तपासादरम्यान ही कार पुन्हा खालापूर टोल नाक्यावरून मुंबईकडे पास झाल्याची माहिती मिळाली. वाहनमालकास त्वरित ताब्यात घेऊन वेगवेगळ्या ठिकाणावरून आरोपी राजू पुकळे (२५, रा. कळंबोली), प्रमोद कोकरे (२८, रा. कोपरखैराणे), मायाप्पा वळकुंदे (२४, रा. कळंबोली), किरण सरगर (२८, रा. कामोठे), अशोक पाटील (२३, रा. कळंबोली), संदीप कोकरे (२३, रा. कुर्ला) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गाडीसोबत एकूण आठ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# कळंबोलीत विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली



## पर्यावरण, वन्यजीव संवर्धनासह पाणीबचत व प्लास्टिक निर्मुलनाचा दिला संदेश

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील ज्ञानमंदिर शाळेमध्ये दप्तरविना शाळा या उपक्रमाच्या निमित्ताने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्ताने विविध सामाजिक विषयांवर नागरिकांना संदेश देण्यात आले. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उत्साह हा कौतुकाचा विषय ठरत आहे.

समग्र शिक्षण योजनेत समविष्ट करण्यात आलेल्या नवीन उपक्रमांतर्गत असणारी दप्तराविना शाळा ही संकल्पना महिन्यातून दोनदा राबवली जाते. यानिमित्ताने समाजप्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. इ. पहिली ते चौथीच्या चिमुकल्यांनी यामध्ये सहभाग घेतला. शालेय विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम घरोघरी जाऊन जनजागृती करणारे पत्रके वाटली. त्यानंतर काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये स्वतः बनविलेले पोस्टर्स हातात घेऊन पर्यावरणविषयक जनजागृती केली. त्याचबरोबर वीज व पाणी बचत, प्लास्टिक निर्मूलन, जंगल संवर्धन वन्यप्राणी व पक्षी संवर्धन, हवा व ध्वनी प्रदूषण याविषयी खऱ्या अर्थाने जनजागरण केले.

या बालवयात चिमुकल्या विद्यार्थ्यांना समाज व पर्यावरणबाबत सजग करण्याचा एक छोटासा पण सुंदर उपक्रम शाळेने राबविला. या रॅलीमध्ये प्रशालेच्या मुख्याध्यापिका संजना बाईत यांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांना माहिती दिली. या उपक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष आनंद भिशीकर व महामात्र डॉ. गोविंद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

## चावणे विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील चावणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.

प्रमुख व्याख्याते म्हणून अनिता मोरे, पद्मा नारकर व प्रताप नारकर हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, पालकांची व शिक्षकांची आपल्या आयुष्यातील भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे उपस्थित मान्यवरांनी देऊन त्यांचे समाधान केले. कार्यक्रमासाठी प्रा. खरे सर, योगेश पाटील, विजय मुरकुटे, दशरथ गायकर, मारूती महाराज, अशोक पाटील, मनोज पाटील आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## कळंबोलीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथे बांधिलकी प्रतिष्ठानच्या वतीने नुकतेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.



या शिबिरास कामोठे येथील स्वस्तिक ब्लड बँकचे सहकार्य लाभले, तर नियोजनासाठी सरस्वती इंजिनिअरींग कॉलेजच्या एनएसएस युनिटने परिश्रम घेतले. विशेष म्हणजे महसूल विभागाचे उपायुक्त नासीर मणेर यांची सपत्नीक उपस्थिती लाभली. या वेळी कळंबोली माथाडी कामगार संघटनेचे संचालक संतोष शिंदे, तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकारी शहाजी कुंभार, सरस्वती इंजिनिअरींग कॉलेजच्या एनएसएस विभागाच्या प्रमुख सुनिता पाल, जय हिंद सेवा संस्थेचे पदाधिकारी सुमित जाधव, तुषार शिंदे, सुशांत पाटील, प्रतिक शिंदे, ऋतिक जाधव उपस्थित होते. गोरखनाथ मुटके, बांधिलकी प्रतिष्ठान मार्गदर्शक अविनाश म्हात्रे, अशोक घाडगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्ष पल्लवी निंबाळकर, उपाध्यक्ष स्वप्निल मुटके, सचिव विशाल कावरे, खजिनदार गौरव शिंदे, उपसचिव पत्रकार श्वेता भोईर, सरचिटणीस सुदर्शन म्हात्रे, पदाधिकारी अनिरुद्ध जगताप, गितांजली सावंत, समीर जाधव, सदस्य आदित्य येवले, राहुल चव्हाण, प्रतिक्षा कापरे, श्रीगणेश रुपनवर, सचिन निंबाळकर, योगेश तुपसुंदर यांनी उत्तम नियोजन केले.

**बांधिलकी प्रतिष्ठानच्या सुरू असलेल्या कार्याबद्दल खूप कौतुक, तसेच प्रतिष्ठाच्या समस्त तरुणाईला पुढील उपक्रमांसाठी व वाटचालीस शुभेच्छा. या प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी युवा पिढीसमोर एक आदर्श वस्तू पाठ ठेवला आहे. त्यांचे अनुकरण इतरांनीसुद्धा करावे.**

**-नासीर मणेर, उपायुक्त, ठाणे महसूल विभाग**

## उरण महाविद्यालयात रक्तदान शिबिर उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी मिशन रक्तपेढी, कामोठे यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले. या रक्तदान शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



उरण महाविद्यालय, माजी विद्यार्थी संघ, लायन्स क्लब, मी उरणकर सामाजिक सांस्कृतिक संस्था, टायगर ग्रुप, छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, वुमन्स ऑफ विस्डम इत्यादी उरणमधील संस्थांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड, प्रा. के. ए. शामा, रमेश ठाकूर, सदानंद गायकवाड, विशाल पाटेकर, एनएसएस प्रमुख प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे आदींच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर झाले.




**पनवेल : जांगिड समाजाच्या वतीने श्री विश्वकशर्मा जयंती महोत्सवाचे आयोजन खारघर येथे करण्यात आले होते. या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्यासह माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, खारघर वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अमर उपाध्ये, भाजप सोशल मीडिया सेलचे सहसंयोजक कंचन बिर्ला, जांगिड समाज अध्यक्ष संजय कर्मा, भाजपचे खारघर सरचिटणीस किर्ती नवघरे, प्रिया राजकुमार आदी उपस्थित होते.**

## भाजप उरण द्रोणागिरी नोड अध्यक्षपदी विधित पाटील



**उरण : वार्ताहर**

बोकडवीरा गावचे सामाजिक कार्यकर्ते विधित पाटील यांची भारतीय जनता पक्षाच्या उरण द्रोणागिरी नोड अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. उरणचे आमदार महेश बालदी यांनी नियुक्तीपत्र देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, कामगार नेते सुधीर घरत, महालन विभाग अध्यक्ष महेश कडू, जि. प. सदस्य विजय भोईर, जसखारचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रशांत पाटील, विजय पाटील, उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, नगरसेवक राजेश ठाकूर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष विधीत पाटील यांनी, मी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. पक्ष वाढविण्यासाठी माझे प्रयत्न असतील, असे आश्वासन दिले.

## शास्त्रीय गायन स्पर्धेत गोव्याची अर्चना प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी, तसेच उभरत्या व गुणी कलाकारांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने गेली २६ वर्षे पनवेल कल्चरल असोसिएशन या संस्थेतर्फे हिंदुस्थानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात आहे. या स्पर्धेत पेडणे-गोवा येथील अर्चना कामुलकर हिने प्रथम क्रमांकाचे शैलजा तळेकर स्मृति पारितोषिक पटकाविले.

यावर्षी संस्थेने स्पर्धेचे स्वरुप थोडे बदलून स्पर्धकांकडून ठुमरी अथवा दादरा यापैकी एक आणि बंदिश आणि नाट्यगीत यापैकी एक असे एकूण १५ मिनिटांचे व्हिडीओ क्लिपिंग मागविले होते. स्पर्धेचे हे नवे रुप स्पर्धकांना आवडले आणि केवळ महाराष्ट्रच नाही तर बेळगाव, गोवा येथील एकूण २७ स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले. पहिल्या व्हिडीओ फेरीतून मधुरा सोहनी आणि संदीप वीरकर या परीक्षकांनी १५ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड केली होती. ही अंतिम फेरी अलिकडेच पनवेल कल्चरल असोसिएशनच्या सभागृहात झाली. मुकुंद मराठे आणि नेहा चिम्मलगी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेत पेडणे-गोवा येथील अर्चना कामुलकर हिने प्रथम क्रमांकाचे शैलजा तळेकर स्मृति पारितोषिक रोख ७,५०० रुपये पटकाविले, तर अलिबागच्या स्नेहल पाटील आणि रत्नागिरीच्या वैष्णवी जोशी यांना द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले. पुणे येथील सागर देशमुख याने तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळविले, तर रसिका वैशंपायन आणि पनवेलच्या सुशील अभंगे यांना दोन हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक विभागून देण्यात आले. स्पर्धकांसाठी जरी ही स्पर्धा असली तरी श्रोत्यांसाठी हे एक 'युवा संगीत संमेलन' ठरले. संदीप वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा समिती प्रमुख नंदकुमार कर्वे यांनी ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



**चौक : महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे हे कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातून आमदार म्हणून प्रचंड बहुमताने विजयी झाल्याबद्दल भाजप चौक विभागाच्या वतीने फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.**



**पनवेल : ओएनजीसी कंपनीच्या सीएसआर फंडमधून न्हावे गावासाठी पाच बोअरवेल आणि पाण्याची टाकी देण्यात आली. या वेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमासाठी ओएनजीसीचे जीएम हेड नरेशकुमार किनोजी, एचआर हेड निता टिग्गा, न्हावे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, सदस्य सागर ठाकूर, किसन पाटील, देवेंद्र भोईर, निर्मला ठाकूर, अमृता पाटील, मंजुषा ठाकूर, साधना तांडेल, मीनाक्षी पाटील, रंजना घरत, रवी पाटील, कैलेश पाटील, गजानन म्हात्रे, गायकवाड गुरुजी, प्रकाश कडू आदी उपस्थित होते.**

## फुंडे हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे, तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे गुरुवारी (दि. २) वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात झाले. या अंतर्गत वार्षिक पारितोषिक वितरण, हळदी कुंकू आणि सांस्कृतिक कार्यक्रम असा तिहेरी कार्यक्रम झाला.



कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्या एस. जी. वर्तक, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, रमाकांत म्हात्रे, केशव कडू, लक्ष्मण पाटील, वसंत तांडेल, राजेंद्र ठाकूर, दिलीप तांडेल, दर्शन घरत, योगेश पाटील, मीनाक्षी म्हात्रे, डोंगरीचे सरपंच संकेत घरत, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ओ. एस. तुमडे, कुटे सर, माता पालक संघाच्या सदस्यांच्या हस्ते प्रतिमपूजन आणि दीपप्रज्वलन झाले. वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरुवात पारितोषिक वितरणाने झाली. संपूर्ण शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यानंतर हळदी कुंकू समारंभ झाला. स्कूल कमिटी सदस्य मीनाक्षी म्हात्रे यांनी माता पालकांना सौभाग्य अलंकाराचे महत्त्व समजावून सांगितले, तर प्राचार्या एस. जी. वर्तक यांनी पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माता पालकांशी संवाद साधला. यानंतर दुपारी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. इ. पाचवी ते १२वी अखेर सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमात सहभागी होऊन अप्रतिम नृत्याविष्कार सादर केले.

कोळी नृत्य, आदिवासी नृत्य, लावणी, लोकनृत्य, देवीचा जागर, गोंधळ, गायन, नाटिका या सर्वच प्रकारांचा एक सुंदर मिलाप या सांस्कृतिक कार्यक्रमात पहायला मिळाला.

## रोटरी घनदाट जंगलाची ख्याती आता आंतरराष्ट्रीय स्तरावर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलकरांचे स्वप्न असलेल्या आणि शहराच्या मध्यभागी वाढत असलेल्या नियोजित रोटरी घनदाट जंगलाची ख्याती आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचल्याचे दिसत आहे. या उपक्रमाची दखल घेत रोटरी आंतरराष्ट्रीय टीआरएफ ट्रस्टी रो. डॉ. भरत पंड्या यांनी या उपक्रमाला भेट दिली.

या भेटीमध्ये त्यांनी स्वतः वृक्षारोपण केले उपस्थितांना मार्गदर्शन करून उपस्थित रोटरी सदस्यांचे कौतुक केले, तसेच उपक्रमाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन परत भविष्यात या उपक्रमाला भेट देण्याचे आश्वासन दिले. या वृक्षारोपणाच्या वेळी डिस्ट्रीक्ट ३१३१चे गव्हर्नर रो. डॉ. अनिल परमार हे सपत्नीक उपस्थित होते. या संपूर्ण भेटीचे संयोजन रोटरी क्लब ऑफ पनवेल सेन्ट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे यांनी केले होते.

या वेळी क्लबचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, अध्यक्ष लक्ष्मण पाटील, फर्स्ट लेडी पुष्पलता पाटील, डॉ. संजिवनी गुणे, सचिव अनिल ठकेकर, सैतवडेकर, डॉ. अमोद दिवेकर, डॉ. लक्ष्मण आवटे, भगवान पाटील, प्रकाश रानडे, मेघा तांडेल, अनिल खांडेकर, विवेक वेलणकर, संतोष घोडीनदे, अतिष थोरात, सचिन वेरणेकर यांनी हजेरी लावली.



## संपादकीय

# सारस्वतांचा मेळा

वर्धा येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी साहित्यनगरीत सारस्वतांचा मेळा भरला आहे. निमित्त आहे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे. विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून ही पर्वणी साहित्यिकांना उपलब्ध झाली आहे.

**जगभरातील मराठीजनांनी एकत्र येऊन मराठी भाषेची गोडी वाढवावी या हेतूने महाराष्ट्र शासनाच्या वतीने गेल्याच महिन्यात मराठी विश्व संमेलन आयोजित करण्यात आले होते. 'मराठी तितुका मेळवावा' या आशयाखाली तीन दिवस रंगलेल्या या संमेलनात मराठी भाषा, संस्कृती, परंपरांचा वैश्विक गजर झाला. त्यानंतर आणखी एक पर्वणी मराठी साहित्यप्रेमींना अखिल भारतीय मराठी साहित्याच्या निमित्ताने अनुभवण्यास मिळत आहे. संमेलनाच्या मुख्य सभामंडपाला आचार्य विनोबा भावे यांचे, तर मुख्य व्यासपीठाला प्राचार्य राम शेवाळकर यांचे नाव देण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले. राज्याचे भाषा व शिक्षणमंत्री दीपक केसरकर, स्वागताध्यक्ष दत्ता मेघे, संमेलनाध्यक्ष न्या. नरेंद्र चपळगावकर, मावळते अध्यक्ष भारत सासणे व अन्य मान्यवरांची उद्‌घाटन सोहळ्यास उपस्थिती लाभली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या कौटुंबिक स्नेह असलेल्या व्यक्तीचे निधन झाल्याने येऊ शकले नाहीत. या वेळी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी...' हे कविवर्य सुरेश भट यांचे प्रसिद्ध गीत व संमेलन गीत तसेच दीप प्रज्वलनाने साहित्य संमेलनाला प्रारंभ झाला. तत्पूर्वी, परंपरेप्रमाणे ग्रंथदिंडी काढण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग उत्साहवर्धक होता. त्यांनी वृक्षारोपणही केले. दिंडीतल्या पालखीत असलेल्या ग्रामगीता व अन्य ग्रंथाचे पूजन झाले. चित्ररथ, ऐतिहासिक देखावे असलेली वाहने, लेझिम, बँड अशी विविध पथके या सर्वांनी ग्रंथदिंडीची शोभा वाढविली. मंडळी साहित्य संमेलने हे महाराष्ट्राचे एक खास वैशिष्ट्य आहे. मराठी भाषकांची विविध प्रकारची संमेलने दरवर्षी होत असतात. यामध्ये साहित्य संमेलनाला विशेष महत्त्व आहे. मराठी भाषाच इतकी सशक्त व वैविध्यपूर्ण आहे की, संत ज्ञानेश्वर माऊलींनी, माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। अशा शब्दांत मराठीचे वर्णन केले आहे. अशा या मायमराठीचा गजर तीन दिवसीय साहित्य संमेलनात होणार आहे. मुलाखत व मुक्त संवाद, परिसंवाद आणि परिचर्चा, कवितेचा जागर, ग्रंथप्रदर्शनी व इतर कार्यक्रम अशी भरगच्च मेजवानी संमेलनात आहे. या संमेलनाचा समारोप रविवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मराठी भाषा ही आपल्या महाराष्ट्र राज्याची अधिकृत राजभाषा आहे. प्रांतवार ती बदलत असली तरी या मायबोलीतून भावना प्रभावी व स्पष्टपणे व्यक्त होतात, दुसऱ्यांपर्यंत पोहचतात. म्हणूनच तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगायोगाने मराठी भाषा दिनदेखील याच महिन्यात आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषेतील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी, लेखक विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस, जो मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो, परंतु आपल्या मराठी भाषेचा आग्रह, गौरव केवळ या एकाच दिवशी किंवा संमेलनापुरताच न होता दैनंदिन जीवनात प्रत्येकाकडून मराठीचा वापर झाला पाहिजे, तरच तिचे जतन व संवर्धन होईल, असे यानिमित्ताने सांगावेसे वाटते.**

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान





**खबरबात**
**धम्मशील सावंत**

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि निसर्गसौंदर्याने नटलेला रायगड जिल्हा भात उत्पादनाचे कोठार आहे. नाचणी हे पौष्टिक तृणधान्यसुद्धा येथे मोठ्या प्रमाणात घेण्यात येते, तर उरणपासून श्रीवर्धनपर्यंतच्या सागरी किनाऱ्यामुळे मत्स्य व इतर सागरी उत्पादने ही सुद्धा रायगडची वैशिट्यपूर्ण ओळख आहे. मुंबई महानगराची नजीकता जिल्ह्याच्या कृषी बरोबरच औद्योगिक विकासाला चालना देत आहे.

जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकरण योजनेत दोन हजार ६८ लाभार्थ्यांनी, सामुहिक शेततळे योजनेत ३५ लाभार्थ्यांनी, कृषी व मत्स्य प्रक्रिया उद्योग योजनेत १६ लाभार्थ्यांनी, भाजीपाला रोपवाटीका योजनेत १७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत तीन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झाल्या आहेत. या योजनांमधील शेतकरी सहभाग मोठ्या प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, जांभूळ यांची लागवड करणे, त्यावरील प्रक्रिया उद्योग उभारणे, कृषी पर्यटन इत्यादीमध्ये नवयुवक शेतकऱ्यांना खूप संधी आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये भात, नाचणी, आंबा, काजू ही पिके मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांची उत्पादकता १० ते २५ टक्क्यांनी वाढविण्यासाठी कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून तंत्रज्ञान विस्तार कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शासनातर्फे नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत नुकसान भरपाई आणि विमा संरक्षण देण्यात येत आहे.

कृषी विभाग पीक उत्पादनाबरोबर काढणीत्तोर व्यवस्थापन प्रक्रिया, साठवणूक इत्यादी प्रकल्पांच्या माध्यमातून कृषी मालाचे मूल्यवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्ह्याला असलेल्या १२२ किमी. सागरी किनाऱ्यामुळे एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत 'मत्स्य व इतर सागरी उत्पादने' कार्यक्रमास गती देण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना शेतकऱ्यांना माहीत व्हाव्यात, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले व त्यांच्या सहकारी-अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही कृषी योजनांची लेख मालिका सुरू करण्यात आली आहे. चला तर जाणून घेऊया या विविध योजनांविषयीची सविस्तर माहिती...

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (सामूहिक शेततळे)**

लाभार्थी निकष : शेतकरी समुहाकडे (किमान दोन अर्जदार शेतकरी) फलोत्पादन व (फळे, फुले, भाजीपाला, मसाला पिके ई.) पिके असणे आवश्यक.

आवश्यक कागदपत्रे : ७/१२, ८ अ चा नमुना, आधार कार्ड, आधार कार्डशी संलग्न राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, हमीपत्र, संवर्ग प्रमाणपत्र (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता). ऑनलाईन संकेतस्थळ: mahadbtmahait.gov.in, (अर्ज करताना शेतकरी गट निवडावे), आकारमान (मीटर) ३४X३४X४.७०, अनुदान ३.३९ लाख. आकारमान (मीटर) २४X२४X४, अनुदान १.७५ लाख.

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२२-२३ (वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण)**

उद्देश : फलोत्पादन पिकांसाठी संरक्षित सिंचन सुविधा निर्माण करणे, दुष्काळी भागांमध्ये फलोत्पादन पिकांच्या क्षेत्र विस्तारासाठी सिंचन सुविधा निर्माण करणे.

पात्र लाभार्थी : मनरेगा, आरकेव्हीव्हाय, मागेल त्याला शेततळे, इतर योजना व स्वखर्चाने खोदकाम केलेल्या तळ्यांना प्लास्टीक अस्तरीकरण करणारे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत.

आवश्यक कागदपत्रे : ७/१२, ८ अ, आधार कार्ड छायांकीत प्रत, आधार संलग्न, बँक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, संवर्ग प्रमाणपत्र (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता).

१) आकारमान (मी) १५X१५ X३, प्रकल्प खर्च रूपये ५६ हजार ५५१, अनुदान २८ हजार २७५, २) आकारमान (मी) २०X१५X३, प्रकल्प खर्च रूपये ६३ हजार १९६, अनुदान ३१ हजार ५९८, ३) आकारमान (मी) २०X२०X३, प्रकल्प खर्च रूपये ८२ हजार ४३६, अनुदान ४१ हजार २१८. ४) आकारमान (मी) २५X२०X३, प्रकल्प खर्च रूपये ९९ हजार ३४२, अनुदान ४९ हजार ६७१. ५) आकारमान (मी) २५X२५ X३, प्रकल्प खर्च रूपये एक लाख १७ हजार ३९९, अनुदान ५८ हजार ७००. ६) आकारमान (मी) ३०X२५X३, प्रकल्प खर्च रूपये एक लाख ३५ हजार ४५७, अनुदान ६७ हजार ७२८. ७) आकारमान (मी) ३०X३० X३, प्रकल्प खर्च रूपये १ लाख ५६ हजार १२७, अनुदान ७५ हजार.

अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर सुरू आहे.

अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, रायगड**







## बदलते तंत्रज्ञान

### फोन हरवल्यास 'या' पाच टिप्समुळे होईल मदत



सध्याच्या काळात मोबाईल फोन हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलाय. फोनमध्ये आपल्या पर्सनल माहितीच्या सोबतच बँक डिटेलही असतात. त्यामुळे आपला फोन चोरी झाल्यास आपल्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊ शकते, मात्र तुम्ही आयएमईआय नंबरच्या मदतीने सरकारी पोर्टल सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्ट्रीला भेट देऊन तुमचे डिव्हाइस म्हणजेच फोन ब्लॉक करू शकता.

**डेटा रिमोटली हटवा :** बहुतेक वेळा आपल्याला फोनच्या किंमतीपेक्षा त्यात असलेल्या डेटाची काळजी असते. पर्सनल डेटा चुकीच्या हातात गेला तर मोठे नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत, डेटा रिमोटली हटविणे हा एक चांगला पर्याय आहे. या केसमध्ये, आयफोन युजर्स iCloud.com वर जाऊन डिव्हाइस डेटा हटवू शकतात, तर अँड्राईड युजर्स android.com/find वर जाऊन हा डेटा हटवू शकतात.

**फोन ट्रॅक करा** : अँड्राईड आणि आयफोनच्या फाईंड माय डिव्हाईस फीचरद्वारे फोन ट्रॅक करणे खूप सोपे झालेय, पण फोन ऑनलाईन असताना त्याचे लोकेशन फक्त तुम्हीच पाहू शकाल. त्याचप्रमाणे फोन बंद केल्यावर फोनचे शेवटचे लोकेशन युजर्सना दिसते.

**तुमची बँकिंग इन्फर्मेशन प्रोटेक्ट करा** : तसे तर बँकिंग ॲप्समध्ये सिक्युरिटी पिन आणि लॉक असतो, पण तरीही सावधगिरी म्हणून तुमचे पासवर्ड बदला किंवा संबंधित बँकांना फोन करून व्यवहार थांबविण्याबाबत सांगा.

**सोशल मीडियाचे पासवर्ड बदला** : तुमचा फोन कोणाकडे आहे आणि ते त्याचं काय करतील सांगता येत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही तुमचे सोशल मीडिया पासवर्ड ताबडतोब बदला. अन्यथा कोणीही तुमच्या अकाऊंटवरून काहीही पोस्ट करू शकतो किंवा कोणालाही काहीही मॅसेज करू शकतो.

**तुमचे सिम कार्ड ब्लॉक करा** : फोनमध्ये असलेल्या अकाउंटचे ओटीपी फक्त सिम कार्डवर येतात. अशा परिस्थितीत हे ओटीपी पासवर्ड चुकीच्या व्यक्तीच्या हातात गेल्यास नुकसान होऊ शकते. या प्रकरणात, नेटवर्क प्रोव्हाइडरला कॉल करा आणि शक्य तितक्या लवकर तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा.

# चला कर्करोगाला हरवूया...!



**निमित्त**

कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे.

पॅरिस येथे सन २००० मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगाविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगाविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक कर्करोग दिवस' म्हणून जाहीर केला गेला.

कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे, परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते.

यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात.

कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे.

आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेषा जाहीर करते.

या रूपरेषेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.

जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो. या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली, तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे, कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे, कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी, अशा विविध विषयांना अनुसरून देखील रूपरेखा योजण्यात येतात.

**साभार : मराठी विश्वकोष**

## आरोग्य प्रहर

### अधिक प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांमुळे कर्करोगाचा धोका



सध्या बदलत्या जीवनशैलीमुळे अधिक प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थाचे अनेकांकडून सेवन केले जाते, मात्र प्रमाणापेक्षा अधिक प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांमुळे कर्करोग होऊ शकतो, असे ब्रिटनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले. अतिप्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थाचा जास्त वापर कर्करोगाच्या वाढीशी जोडण्यात आला आहे, असे या संशोधकांनी सांगितले.

ब्रिटनमधील 'इम्पीरियल स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ'च्या संशोधकांनी हे संशोधन केले आहे. या संशोधकांनी अतिप्रक्रिया केलेले अन्न आणि कर्करोग होण्याचा धोका यांच्यातील संबंधांचे आजपर्यंतचे सर्वात व्यापक मूल्यांकन केले आहे. शीतपेये, बेकरीचे पदार्थ, तयार खाद्यपदार्थ यांवर अधिक प्रक्रिया केली जाते. या पदार्थाचे वारंवार सेवन आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे या वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

अतिप्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ अनेकदा तुलनेने स्वस्त, सहजपणे उपलब्ध होणारे आणि चमचमीत असतात. आरोग्यदायी पदार्थांना पर्याय म्हणून अनेकदा या पदार्थांचे सेवन केले जाते. या पदार्थांमध्ये मीठ, चरबी व साखरेचे प्रमाण जास्त असते आणि त्यात कृत्रिम पदार्थ असतात. लठ्ठपणा, टाईप २ मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांसह अनेक आजार या पदार्थाचे सातत्याने सेवन केल्यास होऊ शकतात, मात्र या पदार्थाचे नेहमी सेवन केल्याने कर्करोगही होऊ शकतो, असे या संशोधकांनी सांगितले. त्यासाठी या संशोधकांनी दोन लाख मध्यमवयीन प्रौढ व्यक्तींची आहाराविषयी माहिती गोळा केली. संशोधकांनी १० वर्षांच्या कालावधीत सहभागींच्या आरोग्याचे निरीक्षण केले.

त्या वेळी असे आढळले की, अधिक प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थाचे जास्त सेवन केल्याने एकूणच कर्करोग होण्याचा धोका जास्त असतो. अंडाशय, स्तर आणि मेंदूच्या कर्करोगाशी या आहाराचा संबंध असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

**क्लिक...क्लिक...!**





**पाली : सह्याद्रीच्या डोंगररांगा, विपुल वनसंपदा लाभलेल्या रायगड जिल्ह्यातील डोंगरात, रस्त्याच्या कडेला, माळरान व जंगल आदी ठिकाणी ज्वाला फुले म्हणजेच पळस, गिरीपुष्प व देवचाफा आदी झाडांना बहर आला आहे. जणू काही फुलांचा उत्सव येथे सुरू झाला आहे.** (छाया : धम्मशिल सावंत)

## निवडक

### पाली येथे रविवारी उरूस

**सुधागड :** सुधागड तालुक्यातील पाली येथील प्रसिद्ध हजरत शाह शरफुद्दिन बाबा रहमतुल्लाह यांच्या उरूस कलंदरचा धार्मिक कार्यक्रम रविवारी ५ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा होणार असल्याची माहिती पाली येथील हजरत शाह शरफुद्दिन बाबा दर्गा ट्रस्ट कमिटीने दिली. तीन वर्षाच्या कालखंडानंतर सध्या उरूस कलंदर चा कार्यक्रम घेण्यात येत आहे उरूस कलंदर कार्यक्रमाच्या निमित्ताने ५ फेब्रुवारी रोजी दर्गाह परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत. ६ फेब्रुवारी रोजी भारतातील प्रसिद्ध कव्वाल अजीम नाजा व जुबैर सुलतानी यांची जंगी सामना पहायला मिळणार असल्याची माहिती ट्रस्टने दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने दर्गा परिसरात विविध रंगांची विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

### श्री विश्वकर्मा रौप्य महोत्सवी जयंती

**कर्जत :** श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाजतर्फे श्री विश्वकर्मा



रौप्य महोत्सवी जयंती निमित्त कर्जतमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जत शहरातून ढोल पथकाच्या गजरात श्री विश्वकर्मा प्रभूची मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी ठिकठिकाणी श्री विश्वकर्मा प्रभू यांची आरती करण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनीही विश्वकर्मा प्रभू यांची आरती करून या मिरवणुकीत सहभाग घेतला. समाजाचे अध्यक्ष संजय मालगुंडकर, उपाध्यक्ष चेतन चिखलकर, सेक्रेटरी मिलिंद चिखलकर, माजी अध्यक्ष मुरलीधर पांचाळ, खजिनदार मंगेशकर काणेकर, उपखजिनदार विजय डेरवणकर, अजय चाफेकर, प्रसाद डेरवणकर यांच्या सह श्री विश्वकर्मा पांचाळ समाजाचे बांधव मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या.

### पळचिल येथे वारकऱ्यांचा सत्कार

**पोलादपूर :** श्रीक्षेत्र पळचिल येथे अखंड कोकणातील पारमार्थिक भाग्यविधाते श्रीसंत ज्ञानेश्वर मोरे माऊली यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा, हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळयामध्ये ज्येष्ठ वारकऱ्यांचा आ. गोगावले यांच्याहस्ते टाळजोडी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सदगुरू आनंददादा महाराज मोरे माऊली, माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, सांप्रदायाचे ग्रामीण अध्यक्ष अनंत पार्टे, समाजसेवक अविनाश जाधव, रायगड जिल्हा भाजपा उपाध्यक्ष मनोज भागवत, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, समाजसेवक रघुनाथ जाधव, माजी सभापती महादेव निविलकर, माजी उपसभापती सहदेव जाधव, सांप्रदायाचे सचिव लक्ष्मण मोरे, दशरथ उतेकर, अनिल दळवी, बाळकृष्ण उतेकर, नारायण साने, पापाजी जगदीश सिंग तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# रायगड पोलिसांच्या इतिहासाचा पट उलगडणार

## अलिबागच्या अधीक्षक कार्यालयात उभे राहणार वस्तुसंग्रहालय

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाचा इतिहासाचा पट लवकरच उलगडणार आहे. पोलीस दलाच्या आजवरच्या वाटचालीचा ठेवा वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून जतन केला जाणार आहे. अलिबाग येथील पोलीस अधिक्षक कार्यालयात लवकरच हे वस्तुसंग्रहालय उभे राहणार आहे.




ब्रिटीशकाळापासून रायगड जिल्ह्यात पोलीस दल अस्तित्वात आहे. गेल्या दीडशे ते दोनशे वर्षाच्या कालखंडात पोलीस दलाने अनेक स्थितंतरे पाहिली आहेत. या स्थितंतराचा वारसा सांगणाऱ्या अनेक वस्तु, शस्त्र, कागदपत्र आजही पोलीस दलाकडे आहेत. या सर्व घटकांचा संग्रह करून त्याचे छोटेखानी संग्रहालय तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरु झाल्या आहेत.

बिटीशकालीन पोलीस व्यवस्था कशी होती. त्यात स्वातंत्रप्राप्ती नंतर कसे बदल होत गेले. गुन्हेगारीचे स्वरूप कसे बदलत गेले. पोलीस दलातील शस्त्रामध्ये कशी सुधारणा होत गेली. पोलीसांचे पोषाख कसे बदलत गेले. याशिवाय पोलीस मुख्यालयातील जुन्या वास्तूंचा इतिहास, पथदिव्यांची व्यवस्था, पोलीसांच्या संपर्क यंत्रणांचे बदलते स्वरुप, पोलीस अधिक्षक बंगल्याचा इतिहास या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून उलगडला जाणार आहे.

पोलीस अधिक्षक कार्यालयातील समाधान कक्ष आणि मध्यवर्ती भागात असलेल्या मोकळ्या जागेत हे वस्तुसंग्रहालय तयार केले जाणार आहे.

हे वस्तुसंग्रहालय अलिबागमधील पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरु शकेल.

> पोलीस मुख्यालय परिसरात अनेक दुर्मिळ वस्तूंचा ठेवा पडून आहे. त्याची सुसत्रपणे मांडणी करून पोलीस अधिक्षक कार्यालयात एक छोटेखानी वस्तुसंग्रहालय उभारण्यात येणार आहे, ज्यामुळे रायगड पोलीस दलाच्या इतिहासाची माहिती जनसमान्यांना तसेच पर्यटकांना होऊ शकेल. या दुर्मिळ वास्तुंचे जतन आणि संवर्धनही होण्यास यामुळे मदत होईल.
>
> –सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड

## भालिवडी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भालिवडी ग्रुप ग्रामपंचायतमधील ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून मनमानी सुरू असल्याने त्यांची बदली करण्यात यावी अशी मागणी सरपंच आणि सर्व सदस्यांनी केली आहे. कर्जत पंचायत समिती कडून त्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर ग्रामपंचायतमधील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांनी सर्वांनी एकत्र येत भालीवडी ग्रुप ग्रामपंचायतीला ठोकले टाळे ठोकले आहे.



भालिवडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी राजश्री कदम यांच्याविरोधात सरपंच आणि सदस्य आक्रमक झाले आहेत.त्यांचे निलंबन करण्याची मागणी सरपंच दिपक कार्ले यांनी केली असून तसे निवेदन सरपंच यांच्याकडून कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांना देण्यात आले आहे.

सरपंच कार्ले यांनी ग्रामविकास अधिकारी राजश्री कदम यांच्याविरोधात यापूर्वी केलेल्या तक्रारीवर कर्जत पंचायत समितीकडून कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती. त्यामुळे कार्यालयाला टाळ ठोकले.

प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला कोणतेही कारण न देता अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यावर कर्जत पंचायत समितीने निलंबनाची कारवाई करावी. अशी मागणी सरपंच दिपक कार्ले यांनी केली आहे. या निवेदनावर सरपंच दीपक कार्ले, उपसरपंच समिर ठाकरे आणि सदस्य राजेश शेळके, गुरुनाथ मुकणे, आशा कर्णुक, नंदिनी माळी, प्रमिला कटके, मजुळा पवार, कमल हिलम या सदस्यांच्या सह्या आहेत.

## अलिबाग कोळीवाड्यात खंडोबारायाची पालखी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग कोळीवाडा येथे गुरुवारी (दि. २) श्री खंडोबा महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. पारंपारिक बँडच्या तालावर नाचत हजारो कोळी बांधव भगिनी या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते. यावेळी ठिकठिकाणी दर्शनासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. पालखी सोहळ्यासाठी भंडारा आणि खोबऱ्याची उधळण करण्यात आली. त्यानंतर पालखी माघ पौर्णिमा उत्सवासाठी जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ झाली.

दरवर्षी माघ शुदध व्दादशीला कोळी बांधवांचे श्रदधास्थान असलेल्या खंडोबारायाचा पालखी सोहळा पार पडतो. कोळीवाडयातील श्री खंडोबा मंदिरातून वाजतगाजत ही पालखी निघाली संपूर्ण कोळीवाडयात फिरून मुळे गावाजवळ संगम या स्थानी पाहोचली. तेथे खंडोबाच्या स्थानापाशी पूजा अर्चा करून पालखी मोजक्याच मानकऱ्यांसह जेजुरीच्या दिशेने रवाना झाली. आज वाटेत एकविरा येथे विश्राम करून उद्या जेजुरीत पोहोचेल. माघ पौर्णिमेला जेजुरी गडावर होणाऱ्या



उत्सवात पालखीचा सहभाग असेल. दुसऱ्या दिवशी सर्व मानपानाचे विधी उरकून पालखीचे पुन्हा अलिबागकडे प्रस्थान होईल.

आजच्या पालखी सोहळयात कोळी बांधव भगिनी, लहान मुलं मोठया संख्येने सहभागी झाले होते. येळकोट येळकोट जय मल्हारचा घोष करीत शहरातील मुख्य मार्गावरून दर्शन देत संगमच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी पारंपारीक बॅन्डपथक आकर्षण ठरले. वाटेत भंडारा आणि खोबऱ्याची उधळण होत असल्याने सर्वजण भक्तगण आणि पालखी मार्ग हळदीच्या रंगाने न्हावून निघाला होता. वरसोली येथेही अशाच प्रकारे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

## जिल्ह्यातील चार ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील कामार्ली ग्रामपंचायतीसह उरणमधील पुनाडे व दिघोडे तसेच पेण तालुक्यातील उंबर्डे या चार ग्रामपंचायतीना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ३) आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान केले.




स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय कामकाज कार्यक्षम व्हावे आणि कार्यपद्धतीत गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आयएसओ प्रमाणिकीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने २०१९ मध्ये घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन मिळावे, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतींचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, स्वच्छतागृहे बांधणे, गावात साफसफाई असणे, गावात व्यायमशाळा, स्वच्छ पाणीपुरवठा करणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली, ग्रामसभांत नियमित विषयांवर चर्चा, गावात वृक्षारोपण करणे यासह इतर शासकीय योजना राबविण्यावर भर देण्यात येत आहे. या सर्व बाबींकडे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील सातत्याने पाठपुरावा करीत होते.

जिल्ह्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या ५० ग्रामपंचायतींना आयएसओ करण्यासाठी व्हि.एन.टेक्नो. रिसर्च प्रा.लि. कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या सर्व प्रयत्नांना यश मिळाले असून जानेवारी महिन्यात जिल्ह्यातील बोरीस गुंजीस, सातीर्जे, सारळ ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन प्राप्त झाले होते. यानंतर शुक्रवारी अलिबाग तालुक्यातील कामार्ली उरणमधील पुनाडे व दिघोडे तसेच पेण तालुक्यातील उंबर्डे या चार ग्रामपंचायतींच्या सरपंच व ग्रामसेवक याच्याकडे डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी सल्लागार कंपनीचे विकास जाधव, उरण विस्तार अधिकारी अनिल नारंगीकर उपस्थित होते.

## वारे–देवपाडा रस्त्याच्या बाजूने अतिक्रमण

### स्थानिकांनी केली बांधकाम विभागाकडे तक्रार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वारे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वारे–चिंचवाडी–देवपाडा रस्त्याच्या लगत मुंबई स्थित धनिकांकडून बांधकाम करण्यात आले आहे. रस्त्याच्या बाजूने करण्यात आलेले ते बांधकाम वाहतुकीस अडथळा ठरत असून अपघात होण्याची शक्यता वारे – देवपाडा रस्त्यावर निर्माण झाली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी रस्त्याच्या बाजूने करण्यात आलेले अतिक्रमण



बांधकामाबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली आहे.

वारे येथे मुंबईतील धनिकांकडून जमीन खरेदी करण्यात आली आहे. वारे – चिंचवाडी रस्त्यालगत असलेल्या सदर च्या जमिनीचा विकास करतांना जमीन मालकांनी शासनाचे नियम धाब्यावर बसविले आहेत. रस्त्याच्या साईड पट्टीवर दगडी भिंतीचे बांधकाम काम केले आहे. परिणामी त्या ठिकाणी असलेल्या वळणाच्या रस्त्यावर बांधकाम झाल्याने वाहनचालकांना समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज येत नाही. तसेच पुढे तिव्र उतार आणि मोठे वळण यामुळे हा रास्ता वाहनचालकांसाठी धोकादायक बनला आहे. या बांधकाम मुळे दररोज त्या रस्त्यावर अपघात होत आहेत आणि त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी रस्त्याच्या बाजूला करण्यात आलेली बांधकाम बाजूला करावे अशी मागणी केली आहे.

> **वारे–चिंचवाडी रस्त्याच्या बाजूला करण्यात आलेल्या अतिक्रमण बाबत स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार अर्ज केला आहे. त्याबाबत स्थळ पाहणी करून वरिष्ठांना अहवाल पाठवण्यात येईल आणि ग्रामस्थांना माहिती देण्यात येईल.**
>
> **–संजयकुमार आडे, कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कर्जत**

## उंबरखिंड आम्हाला विजयाची प्रेरणा देईल : प्रशांत देशमुख



**चौक : रामप्रहर वृत्त**

शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली उंबरखिंड प्रत्येकाला विजयाची प्रेरणा देईल. प्रत्येक माणसाने येथे येऊन नतमस्तक व्हावे, असे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साक्षीने उंबरखिंड ची लढाई सरनोबत नेताजी पालकर यांनी २ फेब्रुवारी १६६१ रोजी जिंकली. त्याचा ३६२ विजय दिन रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती खालापूर, ग्रामपंचायत चावणी व शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांच्यावतीने साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रशांत देशमुख बोलतं होते.

उत्तर कोकण जिंकण्यासाठी औरंगजेबाने १६६१ ला शाहीस्तेखान यास छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविरोधात लढण्यासाठी पाठविले. छत्रपती शिवाजी महाराज यांना याची खबर त्यांच्या गुप्तचर यंत्रणांनी अगोदरच दिल्याने महाराज प्रति शिवाजी नेताजी पालकर यांच्याबरोबर सैनिकांसह या भागात दाखल झाले होते. शाहिस्तेखानाचा विश्वासू सरदार कारतलब खान हा आपल्या मोगल सैन्यासह घाट उतरून उंबर खिंडीत उतरत असताना अती दूर्गमभाग त्यात दोन्ही बाजूस कड्याकपाऱ्या, घनदाट अरण्य, रखरखते उन यामुळे त्याची दमछाक झाली होती. खिंडीत दबा धरून बसलेल्या नेताजी पालकर यांच्या सैन्याने मोगल सैन्याची दाणादाण उडविली. . छत्रपती शिवाजी महाराज यांनी पुढील जबाबदारी सर नौबत नेताजी पालकर यांच्याकडे देऊन पुढील मोहिमेस गेले.

यावेळी गटविकास अधिकारी बालाजी पुरी, माजी नगरसेवक सुनिल पाटील, सभापती नरेश पाटील, माजी सरपंच अंकित साखरे, चावणीचे सरपंच बाळू आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, विस्तार अधिकारी महादेव शिंदे, शैलेन्द्र तांडेल ग्रामसेवक अविनाश पिंपलकर शिवदुर्ग मित्रमंडळ उपस्थित होते.

## म्हशींची वाहतूक करणारा टेम्पो पेण पोलिसांनी पकडला

**पेण : प्रतिनिधी**

पेण तरणखोप हद्दीत ५ म्हशी विनापरवाना विक्रीसाठी नेणाऱ्या एम एच ०३ सी.व्ही. ९३५७ टेम्पो पेण पोलिसांनी पकडून जप्त केला असून दोन आरोपींविरोधात प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासत चालकाकडे कालबाह्य झालेले कागदपत्र तसेच जनावरांची वैद्यकीय तपासणी केली नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत पेण पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करण्यात येत आहे. या मार्गावरून गुरांची वाहतूक करण्यात येत



असते असे गुरे वाहतूक करणाऱ्यांचा सखोल तपास लावून ही जनावरे कोठे व कशासाठी नेण्यात येतात हे सबंधित अधिकाऱ्यांनी पाहण्याची गरज आहे ही जनावरे कत्तलीसाठी तर नेली जात नाहीत ना? असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/ agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.

| **Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/ DN/KHR/Re-Ten-7/22-23 **(RFx No. 7000026092)** | | | **Period for Submission of E-Bid:** 03.02.2023 to 10.02.2023 up to 23:59 Hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work:** Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus Conductor Span at 400kV R.S., Kharghar. | | | | | |
| **Estimated Cost (in Rs.)** | **EMD (in Rs.)** | **Tender Fee (in Rs.)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| 14,30,827.87 (Including GST) | 14,308.28 | 500/- + GST | 10.02.2023 up to 23:59 Hrs | 13.02.2023 at 10:00 Hrs (If possible) | 13.02.2023 at 10:15 Hrs (If possible) |
| **Contact Persons:** (1) Mr. S.J. Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040 (2) Ms. P.C. Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988 For further details, visit our website **www.mahatransco.in** | | | | | |

1) Tender documents can be downloaded by online only from aforesaid website.
2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/ agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.

| **Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/ DN/KHR/Ten-9/22-23 **(RFx No. 7000026071)** | | | **Period for Submission of E-Bid:** 03.02.2023 to 10.02.2023 up to 23:59 Hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work:** Providing and fixing of fire bucket sheds with buckets at 400kV RS, Kharghar. | | | | | |
| **Estimated Cost (in Rs.)** | **EMD (in Rs.)** | **Tender Fee (in Rs.)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| 10,30,144.02 (Including GST) | 10,301.44 | 500/- + GST | 10.02.2023 up to 23:59 Hrs | 13.02.2023 at 10:00 Hrs (If possible) | 13.02.2023 at 10:15 Hrs (If possible) |
| **Contact Persons:** (1) Mr. S.J. Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040 (2) Ms. P.C. Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988 For further details, visit our website **www.mahatransco.in** | | | | | |

1) Tender documents can be downloaded by online only from aforesaid website.
2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

## निवडक

### कोप्रोली येथील तरुण बेपत्ता

**पनवेल** : तालुक्यातील कोप्रोली येथून एक तरुण आपल्या राहत्या घरातून कोणास काही एक न सांगत निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अविनाश चव्हाण असे या बेपत्ता तरुणाचे नाव असून वय २६, रंग गोरा, उंची अंदाजे सहा फूट चार इंच, अंगाने सडपातळ, दाढी काळी व वाढलेली, उजव्या हाताचे मनगटामध्ये स्टीलचे कडे, उजव्या तर्जनीमध्ये सोन्याची अंगठी आहे तसेच अंगात टीशर्ट व जिन्स पॅन्ट घातलेली आहे. त्याला मराठी, हिंदीसोबत इंग्रजी भाषा बोलता येते. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी (क्र. २७४५२४४४) किंवा पोहवा. संतोष चिकणे यांच्याशी संपर्क साधावा.



### भाजपतर्फे जुईनगरमध्ये महाराष्ट्र जत्रोत्सव

**नवी मुंबई** : संत, सज्जन, राजे, महाराजे, महापुरुष यांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राला असलेला जाज्वल्य इतिहास ही महाराष्ट्राची खरी गाथा आहे. म्हणूनच जुईनगरमध्ये भव्य महाराष्ट्र जत्रोत्सव ३ ते १२ फेब्रुवारीदरम्यान श्री स्वामी समर्थ मठाच्या बाजूला सेक्टर २२ येथे आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे, भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत, महामंत्री निलेश म्हात्रे, महामंत्री विजय घाटे, नेरूळ तालुकाध्यक्ष राजू तिकोने, युवा अध्यक्ष दत्ता घगाळे, सुहासिनी नायडू यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ७ वाजता होणार आहे. महोत्सवात उपस्थित राहण्यासाठी भाजप महामंत्री डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांनी आवाहन केले आहे.

### जयराम कदम यांना जीवन गौरव

**पनवेल :** कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघातर्फे कोयना-वेळे येथील जयराम मारूती कदम यांना यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे मूळ सातारा जिल्ह्यातून विस्थापित झालेल्या मराठा समाजाला एकत्र करून संपूर्ण समाज एकसंघ रहावा यासाठी कोयना क्षत्रिय समाज सेवा संघाची स्थापना करण्यात आली. या सेवा संघातर्फे दरवर्षी समाज घडविण्याचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान केला जातो. त्या अनुषंगाने जयराम मारूती कदम यांच्या गावपातळीपासून समाज स्तरापर्यंत सामाजिक एकता व रूढी-परंपरा जोपासताना अनिष्ठ रितीरिवाज दूर सारून समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.



# नवी मुंबईत चालता, बोलता स्वच्छता अभियान

## ■ लोकसहभागातून वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविण्याकडे विशेष लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे कचऱ्याचे निर्मितीच्याच ठिकाणी म्हणजे आपल्या घरातच वर्गीकरण होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार सर्वच विभागांमध्ये लोकसहभागातून वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविण्याकडेही विशेष लक्ष दिले जात आहे.

असाच स्वच्छतेविषयी जनजागृती करणारा 'चालता, बोलता स्वच्छता' हा अभिनव उपक्रम कोपरखैरणे विभागात १ फेब्रुवारीपासून राबविण्यास सुरुवात झाली असून नवी मुंबई महानगरपालिका आणि शेल्टर असोसिएट्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा आगळावेगळा उपक्रम राबविला जात आहे.





या उपक्रमांतर्गत रेल्वेस्टेशन, मार्केट, उद्याने, शाळा, महाविद्यालय परिसर अशा वर्दळीच्या ठिकाणी सायं. ५ ते ७ या वेळेत महानगरपालिकेचे स्वच्छता अधिकारी, कर्मचारी तसेच शेल्टर असोसिएट्सचे प्रतिनिधी असा सहा-सात जणांचा समूह जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत आहे. यामध्ये सुरुवातीला जनजागृती करून माहिती दिली जाते, तसेच त्यानंतर उपस्थितांना स्वच्छतेविषयी सहज सोपे प्रश्न विचारून त्यांना स्वच्छता साहित्य स्वरुपात आकर्षक बक्षिसे दिली जात आहेत. अशाच प्रकारे वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांशी संवाद साधून त्यांना स्वच्छतेविषयी प्रश्न विचारून योग्य उत्तरे देणाऱ्या नागरिकांनाही बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले जात आहे.

चालता बोलता स्वच्छता हा स्वच्छतेविषयी माहिती देणारा व नागरिकांना प्रोत्साहित करणारा आगळावेगळा उपक्रम नागरिकांच्या पसंतीस पडला असून सर्वच ठिकाणी नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळताना दिसत आहे. तुर्भे विभागाचे स्वच्छता अधिकारी सुधाकर वडजे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम शेल्टर असोसिएशनच्या सहकार्याने राबविला जात आहे.

अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे आणि मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे यांचे मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले आहे. तुर्भे विभागाचे स्वच्छता निरीक्षक सर्वश्री जयेश पाटील, विजय दुर्लेकर, भूषण पाटील, धनंजय खरे याच्यासह तुर्भे विभागातील स्वच्छता कामांचे सर्व पर्यवेक्षक तसेच शेल्टर असोसिएशनच्या धनश्री गुरव व अमोल गाडे, मंगेश कदम, मनीषा सुर्वे, सोनी भोसले, अश्विनी गायकवाड, मेघा वंजारे आदी सहकाऱ्यांच्या माध्यमातून हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला जात आहे.

## डिलेव्हरी बॉयकडूनच कंपनीमध्ये चोरी

### सात लाख ६२ हजारांचा घातला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाईन मागवलेल्या वस्तूंची डिलिव्हरी करणाऱ्या डिलिव्हरी बॉयनेच २२ महागड्या मोबाईलची चोरी करून कंपनीला तब्बल सात लाख ६२ हजार रुपयांचा चुना लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कलिमखान बाबुखान पठाण (३४) असे डिलिव्हरीबॉयचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याला अटक केली आहे, तसेच त्याच्या घरातून पाच मोबाइल हस्तगत केले आहेत.

कलिमखान पठाण हा सीबीडी बेलापूर येथील शहाबाज गावात राहण्यास असून तो खारघरमधील एनटेक्स ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस या कंपनीत डिलिव्हरीबॉयचे काम करीत होता. कंपनीच्या कार्यालयातून डिलिव्हरीसाठी नेलेल्या वस्तू तसेच परत आणून जमा केलेल्या वस्तू व जमा केलेले पैशांची नोंद खारघरमधील शाखेमध्ये केली जाते. गत सप्टेंबरमध्ये कंपनीच्या वतीने व्यवहाराची तपासणी करण्यात आली असता, खारघर शाखेमधील मोबाईल फोनची संख्या व हिशेबाचा मेळ बसत नसल्याचे कंपनीतील अधिकाऱ्यांच्या लक्षात आले.

त्यामुळे विभागाची माहिती काढली असता, डिलिव्हरी बॉय कलिमखान पठाण याच्यावर संशय आला. कंपनीने त्याच्यावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून पाळत ठेवली. कलिमखान हाच कंपनीतील मोबाईलची चोरी करीत असल्याचे लक्षात आले.

बुधवारी तो खारघर येथील कंपनीच्या कार्यालयात आला असताना त्याच्याकडे विचारपूस केली, मात्र सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याला कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता, त्याने दोन मोबाईलची चोरी केल्याचे कबूल केले, तसेच दोन मोबाईल घरी ठेवल्याचे सांगितले, मात्र त्याच्या घरात पाच मोबाईल सापडले.

त्यानंतर कंपनीने आपल्या सिस्टीमची तपासणी केली असता गत पाच महिन्यात एकूण २२ मोबाईलची चोरी झाल्याचे आढळून आले. कलिमखानने मोबाईलची चोरी करून ग्राहकांना विकल्याचे कबूल केले.

## विश्राळी तलावात बुडून एकाचा मृत्यू

**पनवेल** : शहरातील गुजराती शाळेजवळील विश्राळी तलावात एका अनोळखी व्यक्तीचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली असून पनवेल शहर पोलीस या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

या व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून अंगाने सडपातळ, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट पाच इंच, दाढी-मिशा वाढलेली काळी, उजव्या खांद्यावर त्रिशुल व ओम गोंदलेले असून उजव्या डोळयाच्या वर जखम आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (क्र. २७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक संजय देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

## बजेटसाठी नागरिकांकडून सूचना मागवाव्यात

### भाजपचे विकास सोरटे यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

येणाऱ्या सन २०२३-२४ वर्षाकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याचे काम सुरू आहे. तेव्हा महानगरपालिकेने नागरिकांकडून सूचना मागवाव्यात, अशी मागणी भाजपचे अनुसूचित जाती जमातीचे जिल्हाध्यक्ष विकास सोरटे यांनी आयुक्तांना केली आहे.

सध्या पालिकेवर प्रशासकीय राजवट असल्यामुळे व पालिकेत लोकप्रतिनिधी सध्या नसल्यामुळे प्रशासनाला कोणत्या प्रभागात कोणत्या समस्या व अडचणी आहेत याची कदाचित संपूर्ण माहिती नसावी म्हणून आपण नागरिकांकडून २०२३-२४च्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेने नागरिकांनकडून सूचना मागवाव्यात अशी मागणी सोरटे यांनी केली आहे.

लोकप्रतिनिधी हे नवी मुंबईकरांनीच निवडून दिलेले असतात. त्यामुळे त्यांच्या गैरहजेरीत जर नागरिकांकडूनच त्यांच्या समस्या व सूचना मागवाव्यात. जेणेकरून नवी मुंबईकरांना त्यांचे प्रशासनासमोर मत मांडण्याचा अधिकार प्राप्त होईल व यातून अनेक जागरुक व जबाबदार नागरिक ही घडतील असेही विकास सोरटे यांनी म्हंटले आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या उडान महोत्सवात उरण महाविद्यालय प्रथम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विस्तार विभागाच्या विद्यार्थ्यांनी उडान महोत्सवात सहभाग नोंदवला. त्यामध्ये उरण महाविद्यालयाने पथनाट्य सादरीकरणाला प्रथम क्रमांक पटकावला.

त्याचप्रमाणे काजल शर्मा हिने पोस्टर मेकिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. उचकी हे पथनाट्य संवेदनशील व सामाजिक विषयावर होते. या कार्यक्रमात रायगड जिल्हा समन्वयक प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांना सन्मानित करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड, प्रा. हण्णत शेख, सर्व शिक्षक, शिक्षकेत कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## मारहाण करणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलचे निलंबन

**पनवेल : वार्ताहर**

दुचाकीला धडक दिल्याचा जाब विचारण्याकरीता गेलेल्या पती व गरोदर पत्नीला दारूच्या नशेत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबलने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात पोलिसावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारची गंभीर दखल नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी घेतली असून कॉन्स्टेबलचे निलंबन करण्यात आले आहे.

खारघर येथे सोनोग्राफीसाठी पती-पत्नी जात असताना त्यांच्या मागून येणाऱ्या व दारूच्या नशेत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबल पोलीस दिनेश महाजन यांची चारचाकी गाडी त्यांच्या दुचाकीला घासून पुढे गेली. विवाहितेच्या पतीने आपल्या कार थांबवण्याचा प्रयत्न केला असता, महाजन यांनी त्यांच्या दुचाकीला धडक देण्याचा प्रयत्न केला. यानंतर त्याने गाडी थांबवत पोलिसांची पाटी काढून दाखवत, मी पोलीस आहे, तुला काय करायचे आहे, असे दमदाटी करून शिवीगाळ व मारहाण करायला सुरुवात केली. त्यानंतर त्याने विवाहितेला हाताने बाजूला ढकलून तिचा विनयभंग केला होता.

याप्रकरणी विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस कॉन्स्टेबल दिनेश महाजनविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकाराची पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गंभीर दखल घेत पोलीस कॉन्स्टेबल दिनेश महाजन याचे तत्काळ निलंबन केले.

## खांदा वसाहतीत बचत गट महिला मेळावा उत्साहात



**पनवेल : वार्ताहर**

स्वामी विवेकानंद मानव सेवा बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून खांदा वसाहतीत बचत गटाच्या महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळे स्टॉल लावून उत्पादने प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यानिमित्ताने ८९ महिलांचे वेगवेगळ्या वस्तू विक्रीचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये कपडे, ज्वेलरी, हॅन्डमेड गृहोपयोगी वस्तूंचा समावेश होता. त्याचबरोबर बँकांचे प्रतिनिधी ही या मेळाव्यामध्ये सहभागी झाले होते. तीन बँकिंग स्टॉल या ठिकाणी मांडण्यात आले होते. उपस्थित महिलांचे झिरो बॅलन्समध्ये फिनो बँकेमध्ये अकाउंट उघडण्यात आले. बचत गटांसाठी कमी व्याजदरामध्ये कर्ज कसे उपलब्ध होईल. त्याचबरोबर त्यांना पतपुरवठा करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी अंजली इनामदार, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता कोलते, सचिव डॉ. योगेंद्र कोलते, सुहासिनी केकाणे यांनी सहभागी बचत गट व महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी पनवेलच्या माजी उपमहापौर सिताताई पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजेश्री वावेकर, सुशीला घरत, चंद्रकला शेळके, पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे, वर्षा नाईक, प्रेमा संजय भोपी, नीता माळी उपस्थित होत्या. त्याचबरोबर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रंजना सडोलीकर, माजी प्रा. संजीविनी पैठणकर, दिशा व्यासपीठाच्या संस्थापिका निलम आंधळे, पर्यावरणप्रेमी प्राजक्ता शहा, मेघना कदम, कल्याणी नाईक, संध्याराणी पाटील आदी मान्यवरांची या कार्यक्रमाला उपस्थिती लाभली.

यानिमित्ताने महिला मेळावा, मंगळागौर, संगीत भजनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचबरोबर संस्थेच्या ओपन एज्युकेशनमधील विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचा आविष्कार सादर करीत उपस्थितांचे मन जिंकून घेतले.

**संस्थेच्या वतीने सामाजिक बांधिलकीचे विविध उपक्रम राबवले जातात. विशेष करून महिला व बालकल्याण साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला गेला आहे. महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण व्हावे या उद्देशाने स्वामी विवेकानंद मानव सेवा बहुउद्देशीय संस्था कार्यरत आहे. याच हेतूने खांदा वसाहतीत बचत गट व महिला मेळाव्याचे आयोजन केले होते.**

**-अनिता कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्वामी विवेकानंद मानव सेवा बहुउद्देशीय संस्था**

## पीएफ कार्यालयाची थकबाकी वसुली योजना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी १ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत थकबाकीदार/दोषी आस्थापनांकडून पीएफ थकबाकी वसूल करण्यासाठी विशेष वसुली मोहीम सुरू केली आहे.

प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान म्हणाले की, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी कायदा, १९५२अंतर्गत त्रुटी असलेल्या आस्थापनांवर कारवाई केली जाईल. बँक खाती संलग्न करणे, जंगम आणि जंगम मालमत्ता संलग्न करणे, संलग्न मालमत्तेची विक्री, डिफॉल्टरची अटक आणि ताब्यात घेणे, डिफॉल्टर्सवर खटला चालवणे आणि भारतीय दंड संहिताच्या कलम ४०६/४०९अंतर्गत एफआयआरची नोंदणी करणे समाविष्ट आहे. ते पुढे म्हणाले की, आस्थापनेद्वारे पीएफची थकबाकी जमा न केल्यामुळे, गरीब सभासद, कामगारांना त्यांची वैध पीएफ थकबाकी मिळत नाही आणि सदस्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

वरील कृती टाळण्यासाठी, सर्व डिफॉल्ट आस्थापनांचे नियोक्ते थकबाकी जमा, क्लिअर करू शकतात. मुंबई उपनगरे, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील काही भागांतील नियोक्ता, संघटना आणि कामगार संघटनांना थकबाकीदार आस्थापनांकडून थकबाकी लवकरात लवकर वसूल करण्यासाठी ईपीएफओला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबई महापालिकेला कन्स्ट्रक्शन पुरस्कार

**नवी मुंबई : बातमदार**

सुनियोजित बांधणीचे आधुनिक शहर म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहराने गुणात्मक नागरी सुविधा व अत्याधुनिक प्रकल्पांमुळेही स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. नागरी विकासातील या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेस नुकताच कंन्स्ट्रक्शन वॉर्ड २०२३ हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून ग्रेटर नोएडा येथील विशेष समारंभात सन्मानित करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान स्विकारला.

नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सायन्स पार्क, सेंट्रल लायब्ररी, एनएमएमटी उपक्रमाची वाशी येथील बहुउपयोगी आकर्षक इमारत यासारखे नावीन्यपूर्ण प्रकल्प उभारले जात असून यापूर्वीच्या लौकीकात लक्षणीय भर टाकली जात आहे. उद्यानांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहरात वंडर्स पार्क, पंचतत्वावर आधारित सेंट्रल पार्क, झेन गार्डन, संवेदना उद्यान, निसर्ग उद्यान, रॉक गार्डन अशा विविध संकल्पनांवर आधारित थीम पार्क विकसित करण्यात आलेली आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेची मुख्यालय वास्तू ही देशातील वास्तूरचनेचा एक आदर्शवत नमूना मानला जात असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची रचना व त्याचा डोम वास्तुकलेचा वैशिष्ट्यपूर्ण नमुना म्हणून ओळखला जातो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कोणताही प्रकल्प, वास्तू उभारताना त्यामध्ये कामाच्या गुणवत्तेसोबतच त्याची वास्तुरचनाही वैशिष्ट्यपूर्ण ठेवण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. त्याचप्रमाणे कोणतीही नागरी सुविधा दर्जेदार आणि लोकोपयोगी असण्यावर भर दिला जातो.

पुरस्काराचे सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचेकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आले. या वेळी शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्ति अधिकारी जितेंद्र इंगळे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील व शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे व मदन वाघचौडे उपस्थित होते.





जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी दैनिक राम प्रहरच्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, ५ फेब्रुवारी २०२३ रोजी वाचूया साहित्यिक उमाजी केळुसकर यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# रुंदीकरणात शेकडो झाडांची कत्तल

## रोहा–कोलाड रस्त्याची स्थिती : तोडलेल्या वृक्षांची पुनर्लागवड करण्याची मागणी

**कोलाड : रामप्रहर वृत्त**

मुंबई–गोवा हायवे या राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रोहा–कोलाड महामार्ग, सद्या रोहा–कोलाड मार्गाच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम जोरदार सुरु असून या रुंदीकरणात शेकडो झाडांची कत्तल करण्यात आली असून या मार्गांवर रस्त्याच्या दोन्ही बाजूला डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे असंख्य दासभक्तांनी मेहनत घेऊन वृक्ष लागवड करून ती वाढवली. परंतु ती झाडे रस्त्याच्या रुंदीकरणात तोडण्यात आली. यामुळे दासभक्तांची मेहनत वाया गेली असून रस्ता रुंदीकारणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या झाडांची



लागवड पुन्हा करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

रोहा–कोलाड रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरु असून अपघाताच्या दृष्टीकोनातून या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम महत्वाचे असले तरी या कामाबरोबर तोडण्यात आलेली झाडे लागवड करणे तेवढेच महत्वाचे आहे. वृक्ष लागवड न केल्यास भविष्य काळ कठीण आहे. रस्ता रुंदीकरण तोडण्यात आलेली झाडे तोडून ती विकण्यात आली परंतु तोडून विकलेल्या झाडांच्या बदल्यात रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ती पुन्हा लागवड करावी असे प्रशासनाकडून का सांगण्यात येत नाही?

मुंबई–गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूर चौपदरीकरणाच्या रुंदीकरणाच्या नावाखाली असंख्य झाडांची कत्तल करून त्या झाडांच्या लाकडांची विक्री करून लाखो रुपये कमवले परंतु त्या बदलात कोणत्याही वृक्षाची लागवड केली नाही रस्तारुंदीकरणाचे काम गेली १३ वर्षापासुन सुरु असून या कामात कोणतेही प्रगती नाही परंतु या महामार्गावर तोडण्यात आलेली असंख्य झाडे पुन्हा लावली असतील तर ती बारा वर्षात मोठी झाली असतील परंतु नियोजन मात्र शुन्य असल्यामुळे कोणतेही कामे होतांना दिसत नाही.

### पर्यावरणाबाबत जागरूक रहावे

*दिवसेंदिवस पर्यावरणात बदल होत चालला असून पशुपक्षी यांच्या राहणीमानावर गदा येत आहे तर कधी ओला दुष्काळ गारपीठासह पाऊस, विविध स्वरूपातील वादळे, भूकंप निसर्गाचे बदलत जाणारे स्वरूप आदी घटकांचा आपणास सामना करावा लागत आहे. तसेच वाढते औद्योगिक प्रदूषण यामुळे हवाही मिळत नाही. यामुळे अनेक मोठं–मोठे आजार पसरत आहेत. यासाठी अद्याप वेळ गेलेली नाही निसर्ग साखळीत बाधा येऊ नये यासाठी कोणत्याही कारणासाठी तोडण्यात आलेली झाडे ही पुन्हा लागवड करावी. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन याबाबत जागरूक राहणे काळाची गरज आहे.*

# महाडच्या महिलांनी सर केले मोहनगड शिखर



**महाड : प्रतिनिधी**

महाडच्या सह्याद्री मित्र गिरिभ्रमण क्रीडा संस्थेतर्फे महिलांसाठी आयोजित भटकंती मोहिमेत महाड व परिसरातील १५ महिलांनी वरंध घाटातील सर्वोच्च शिखर किल्ले मोहनगड उर्फ जननी दुर्ग सर करुन महिलांही गिर्यारोहणात मागे नसल्याचे दाखवून दिले.

महिलांमध्ये साहसी वृत्ती वाढावी व त्यांच्यातही गिर्यारोहणाची आवड निर्माण व्हावी यासाठी महाडची सह्याद्री मित्र संस्था महिलांसाठी सुमारे १५ वर्षांपासून भटकंतीचे आयोजन करत आहे. कोरोनामुळे दोन वर्षे यामध्ये खंड पडला. परंतु यानंतर आयोजीत केलेल्या भटकंतीला महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. यावर्षी किल्ले मोहनगडाच्या भटकंतीने पुन्हा याचा श्रीगणेशा करण्यात आला. अति प्राचीन दळणवळणांचा मार्ग असलेल्या वरंध घाटाचा रक्षक म्हणून कावळा किल्ल्याच्या बरोबर हिरडस या किल्ल्याचा वापर होत असे. निरा देवघर धरणाच्या शिरगावकडील बाजूस असणाऱ्या जननी देवीच्या मंदीराजवळून महिलांनी दुर्ग चढाईला सुरुवात केली. अत्यंत खडतर वाटा व दमछाक होत असतानाही सुमारे दोन तासानी

### प्राचीन निर बावीला भेट

*मोहीमेचे नेतृत्व सह्याद्री संस्थेच्या मनिषा शेंडे व संध्या मौर्य यांनी केले. या भटकंतीत मनिषा शेंडे, प्रणाली पाटिल, संध्या मौर्य, समृध्दी गुरव, डॉ. स्नेहा ठोंबरे, अंकीता पवार, डॉ. सपना कुरतरकर, श्रध्दा जोशी, श्रेया वैद्य, स्वप्नाली शिंदे, गौरी माने, श्रध्दा पाटील, रचना साळुंखे, प्रियांका गुजर तसेच सेवानिवृत्त शिक्षिका सुलभा बागडे (वय ६४) या सर्वांनी मोहनगड सर केला. किल्ला उतरल्यानंतर सर्वांनी निरा नदीचे उगमस्थान असलेला प्राचीन निर बावीला भेट दिली.*

समुद्रसपाटीपासून ३ हजार ६३० फूट उंचीवर असलेल्या मोहनगडाचा माथा या महिलांनी गाठला. देरडस मावळातील या दुर्गावरून विस्तीर्ण प्रदेश दृष्टीन पडतो. हा प्रदेश न्याहाळतांना महिलांचा आनंद ओसंडून वाहत होता. ओस पडलेल्या हिरडस मावळातील या दुर्गाचे मोहनगड ' असे ठेवून अफझल खानाच्या स्वारीचे व खानाचे सैन्य अडवण्याची जबाबदारी बाजी पांडे यांना देण्यात आली होती. तसा आदेश बाजीप्रभू देशपांडे यांना महाराजांनी लिहीलेल्या तत्कालीन पत्रात आढळतो. असा हा महत्वाचा गड व त्यावरील शिखर या महिलांनी सर केले.

# माणगाव निकम स्कूलमध्ये प्रशिक्षण शिबिर उत्साहात





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव एज्युकेशन ट्रस्ट ही माणगाव तालुक्यातील अग्रेसर संस्था आहे. अद्ययावत काळाची गरज म्हणून विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांसाठीही नवनवीन उपक्रम राबवून त्यांना प्रशिक्षित करत असते. म्हणूनच शनिवारी एस.एस.निकम इंग्लिश स्कूल लोणेरे येथे माइंडसेट फॉर एज्युकेटर्स या विषयाचे प्रशिक्षण माणगाव शाखेच्या प्राचार्य संगीता कोकाटे यांनी दिले.

प्रशिक्षणाची सुरुवात सरस्वतीपूजनाने करण्यात आली. लोणेरे शाखेच्या प्राचार्या दर्शना चावरेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यानंतर संगीता कोकाटे यांनी माइंडसेट फॉर एज्युकेटर्स या विषयावर आधारित मार्गदर्शन केले. प्रशिक्षणासाठी सर्व शाखेचे प्राचार्या, मुख्याध्यापक, को–ओर्डीनेटर तर साधारणतः ७५ शिक्षकवृंद उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचा मंगळवारी वर्धापन दिन

**अलिबाग : प्रतिनिधी**

७ फेब्रुवारी १९८६ रोजी स्थापन झालेल्या अधिकारी महासंघाच्या ३७व्या वर्धापन दिनाचे परिषद सभागृह, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे मंगळवार, ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता आयोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिन कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असून मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे.

वर्धापन दिन कार्यक्रमात अधिकाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मान्यवरांच्या निदर्शनास आणून त्यावर अभ्यासपूर्ण चर्चा होणार आहे. तसेच कल्याणकेंद्र निधी संकलनाचे उत्तम कार्य केलेल्या पुणे, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, अमरावती, रायगड, नागपूर, नवी मुंबई, रत्नागिरी, बीड या आदर्श जिल्हा समन्वय समित्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त अधिकारी वर्गाने आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन असे मुख्य सल्लागार ग.दि.कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, अध्यक्षा, दुर्गा महिला मंच डॉ.सोनाली कदम, कोषाध्यक्ष नितीन काळे, सरचिटणीस समीर भाटकर यांनी केले आहे.

# ऐतिहासिक उंबरखिंडीत शौर्य दिन साजरा

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मोगल सरदार कर्तलब खान याच्या सैन्याचा खालापूर तालुक्यातील उंबरखिंड येथे छत्रपती शिवाजी महाराज व नेताजी पालकर यांच्यासह मावळ्यांनी गनिमी काव्याने चारी बाजूने हल्ला करीत मोगल सैन्याचा दारून पराभव केला होता. तो दिन शौर्य दिन म्हणून या उंबरखिंडीत दरवर्षी २ फेब्रुवारीला साजरा करण्यात येतो. या निमित्ताने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शिवप्रेमी उपस्थित असतात.

ऐतिहासिक वारसा असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे सहकारी सरनौबत नेताजी पालकर यांचे हे जन्म गाव म्हणून प्रसिध्द आहे. अशा या इतिहासकालीन असलेले चौक गावामधून मशाल ज्योत प्रज्वलीत करण्यात आली.

छत्रपती शिवरायांनी ज्या २७ महत्वपूर्ण लढायांमध्ये भाग घेतला होता. त्यापैकी ही एक लढाई आहे. म्हणून दरवर्षी छावणी येथे ग्रूप ग्रामपंचायत व ग्रामस्थ चावणी पंचायत समिती खालापूर, रायगड जिल्हा परिषद, शिवदुर्ग मित्रमंडळ लोणावळा यांच्यावतीने या वर्षीही ३६२ वा विजयदिन सोहळा समरभूमी उंबरखिंड छावणी येथे आयोजित करण्यात आला. शिस्त बद्ध आणि पारंपारिक खेळा बरोबर विविध कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा उजाळा दिला.

रायगड भूषण शिवशाहीर वैभव घरत–खरोशी–पेण यांनी पोवाडा गाऊन शिवभक्तांना मंत्रमुग्ध केल.त्याच बरोबर शिव व्याख्याते प्रशांत देशमुख यांनी उंबरखिंडच्या इतिहासासमवेत शिवरायांची दुरदृष्टी आणी पारदर्शक राजा म्हणून त्यांच्या कार्याचा उजाळा दिला.

यावेळी शिवदुर्ग मित्रमंडळ लोणावळा, गटविकास अधिकारी बाळाजी पुरी, वरिष्ठअधिकारी, शिल्पादास मॅडम विस्तार अधिकारी, खालापूर पोलीस उपनिरीक्षक, आरोटे, विस्तार अधिकारी खालापूर शैलेंद्र तांडेल, ग्रामसेवक – अविनाश पिंपळकर, सरपंच बाळासाहेब आखाडे, चव्हाण, वनरक्षक लोखंडे, ओव्हाळ, सूर्यवंशी वरिष्ठ विस्तार अधिकारी एम. जी. शिंदे, अंकित साखरे आदी उपस्थित होते.

यावेळी गुरुवंदना ढोल पथक खोपोली यांनी ढोल वाजवून मानवंदना दिली.

# कचरा विल्हेवाटीसाठी रोहा नगरपालिकेची अत्याधुनिक यंत्रणा

## कचरा डेपोत ना वास, ना दुर्गंधी : कचऱ्यातून मिळणार उत्पन्न; नियोजनबद्ध कामाचे कौतुक

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपालिकेच्या हद्दीतील मोठ्या प्रमाणात जमा होत असलेल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी रोहा अष्टमी नगरपरिषदच्यावतीने अत्याधुनिक यंत्रणा उभारले आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात आहे. कचऱ्याचे विलगीकरण, कचऱ्यापासून खत यासह कचऱ्यापासून उत्पन्न रोहा अष्टमी नगरपालिका निर्माण करीत आहे. कचरा डेपो येथील संपूर्ण परिसर आज दुर्गंधी मुक्त होताना दिसत आहे.



कचऱ्याची समस्या सर्वच मोठ्या शहरात भेडसावत असते. नागरिकांच्या अनेक तक्रारी कचरा संदर्भात सातत्याने येत असतात. अशाच पद्धतीने रोहा अष्टमी शहराच्या हद्दीतील जमा होत असलेला कचरा ज्या ठिकाणी एकत्रित करत असत. त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य झाले होते. कचऱ्याचे ढीग जमा झाले होते. सर्वत्र प्लास्टिक हवेतून दूरवर पसरत होता. कचरा डेपो असलेल्या बाजूला शेतात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पसरलेले दिसून येत होते. या कचऱ्याचा परिणाम मुक्या जनावरावरही होताना दिसत होता. अनेक तक्रारी रोहा अष्टमी नगरपरिषेकडे येत होत्या. मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण यांनी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिकेचेवतीने नियोजन करण्याचे ठरवण्यात आले. कचरा व्यवस्थापन करण्यात आले. कचऱ्याचे विल्हेवाट लावण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री रोहा अष्टमी नगरपरिषदेने कचरा डेपो येथे बसवले आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेची साडेतीन एकर जागेवर रोहा रेल्वे स्टेशनच्या पलीकडे कचरा डेपो आहे. या कचरा डेपोमध्ये मोठ्या प्रमाणात गेले कित्येक वर्ष कचऱ्याचे ढीग होते. या कचऱ्याच्या ढिगेमुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत होती. या ठिकाणी भटके कुत्रे, मुकी जनावरे या कचरा डेपोजवळ येत कचऱ्यातून खाद्य शोधताना कित्येकदा प्लास्टिक ही या मुक्या जनावरांच्या पोटात जात असत. या कचरा डेपोमध्ये आलेल्या प्लास्टिक परिसरात हवेतून उडत आजूबाजूला असलेल्या शेतीत पसरत होते. काही वेळा आग लागल्याने मोठ्या प्रमाणात धुर या परिसरात पसरल्यामुळे प्रदूषण होत होते.

रोहा अष्टमी नगरपरिषदेने कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावे यासाठी आता अत्याधुनिक यंत्रणा या कचरा डेपोमध्ये बसवण्यात आलेला आहे. या कचरा डेपोमध्ये सुरुवातीला आणलेल्या कचऱ्याचे विलगीकरण केले जाते. त्यानंतर विविध यंत्रणेच्या माध्यमातून या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. नगरपालिकेने उभारण्यात आलेल्या यंत्रणेमध्ये घातक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी वेगळी यंत्रणा बसवण्यात आली आहे. यामध्ये घातक कचरा गेल्यानंतर त्याची राख शिल्लक राहते. ओला कचरा बायोगॅससाठी पाठवण्यात येतो. या कचरा डेपोमध्ये आलेल्या प्लास्टिकचे तुकडे करून धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना विक्री केली जाते. यामुळे रोहा अष्टमी नगरपरिषदेला या माध्यमातून उत्पन्न मिळत आहे.

ओला कचरा बायोगॅसला जात असताना यातील काही कचरा गांडूळ खतासाठी वापरला जात आहे. या कचरा डेपोमध्ये आलेल्या कचऱ्यामधील कापड, थर्माकोल, प्लास्टिक व अन्य साहित्य याचे वेगवेगळे भाग करून हे संबंधित कारखानाला विकले जात आहे. आज रोहा अष्टमी नगरपरिषदेने कचरा विल्हेवाट लावण्यासाठी नियोजनबद्ध काम केले असल्याने या परिसरात आता दुर्गंधी, प्रदूषण होताना दिसत नाही. रायगड जिल्ह्यात रोहा अष्टमी नगरपरिषदेचे कचरा व्यवस्थापन यंत्रणा सगळ्यात चांगले असल्याचे बोलले जात आहे.

रोहा अष्टमी शहरातील कचरा विल्हेवाट अत्याधुनिक पद्धतीने होत आहेच. परंतु कचऱ्यातून उत्पन्नही रोहा अष्टमी नगरपरिषदेला आज मिळत आहे.

***रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने नगर परिषदेच्या कचरा डेपो येथे कचऱ्याचे विल्हेवाट लावण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उभारले आहे. या अत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून कचऱ्याचे विलगीकरण केले जाते. त्यानंतर ओला व सुका कचरा वेगळा झाल्यावर त्यातील प्लास्टिक बारीक करून विक्रीसाठी उपलब्ध केला आहे, तर ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस व खत प्रकल्पासाठी वापरण्यात येत आहे. आज कचरा डेपो येथे कुठलेही दुर्गंधी येत नाही. कोणतेही प्रदूषण होत नाही. हा परिसर चांगला झाला असून भविष्यात या भागात चांगल्या प्रकारची झाडे लावण्यात येतील. आज उपलब्ध असलेल्या कचरा मे महिन्यापर्यंत पूर्णपणे विल्हेवाट लावण्यात येईल.***

***–डॉ. धीरज चव्हाण***
***मुख्याधिकारी, रोहा अष्टमी नगर परिषद***

# मुदतीपूर्वीच लॉटएंट्री बंद केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान | मुदत वाढवून द्यावी –शरीफ भालदार

**चौक : रामप्रहर वृत्त**

मुदतीपूर्वीच हमीभाव भात खरेदीची लॉट एंट्री साईट बंद झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. लॉटएंट्रीची मुदत वाढवून देण्याची मागणी चेअरमन शरीफ भालदार यांनी केली आहे.

शेतकरी यांना शासनाने हमीभाव दिला मात्र त्याचा फायदा शेतकऱ्यांना होताना दिसत नाही. राज्यातील विशेषतः कोकणातील शेतकरी भात पिक जास्त घेतो. अवेळी पाऊस, नैसर्गिक आपत्तीत, खराब वातावरणामुळे भाताच्या उत्पन्नात घट झाली आहे. कोकणातील शेतकरी हा नेहमी उघड्यावरच आहे.त्याला त्याच्या भाताची हमी कधीच मिळत नाही. त्यामुळे तो त्रस्त आहे. ही भात खरेदी फक्त सहकारी भात गिरणीवरच होते. कोकणातील अनेक सहकारी भात गिरणी मोडीत निघाल्या आहेत. मुळातच भात खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली आहे. त्यामुळे ऑनलाईन अपडेट मिळवण्यासाठी त्याला अनेक प्रयत्न करावे लागतात.

७/१२ ऑनलाईन पद्धतीने घ्यावा लागतो, तर बँक पासबुक असणे गरजेचे आहे. ७/१२ उताऱ्यावर ऑनलाईन पद्धतीने पिक पाणी नोंद घ्यावी लागते, त्यासाठी आपल्या शेतावर जाऊन त्याची नोंद घेताना नेटवर्क उपलब्ध असावे लागते. काही खेडेगावात नेटवर्क अजिबात नाही. अनेक शेतकरी यांच्याकडे स्मार्ट फोन किंवा अँड्राईड फोन नाहीत. ज्यांच्याकडे आहे, त्यांना त्याचा वापर करता येत नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

ऑनलाईन ७/१२ पीकपाणी नोंद नसल्याने शेतकरी यांना भात विकता येत नव्हते, त्यामुळे अनेक शेतकरी यांनी कमी किमतीत आपले भात विकून नुकसान सहन केले आहे. भात खरेदी विक्रीची मुदत ३१ जानेवारी २०२३ पर्यंत होती, परंतु ३० जानेवारी रोजीच बँकेमधील लॉटएन्ट्री बंद झाल्याने चौक परिसरातील सुमारे ५० शेतकरी नेताजी सहकारी भात गिरणी चौक येथे भातासह हजर असताना भात खरेदी बंद झाली, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. नेताजी सहकारी भात गिरणीचे व्हा. चेअरमन शरीफ भालदार यांनी तहसीलदार खालापूर यांच्याकडे धाव घेऊन भात खरेदी विक्रीची मुदत वाढवून देण्याची मागणी केली आहे. लॉटएन्ट्री चालू करावी अशी विनंती करून मुदतीपूर्वी ही लॉटएन्ट्री बंद केली त्यांच्यावर कारवाई करावी अशीही मागणी केली आहे.



# आता लढत ‘कांगारूं’शी

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेसाठी टीम इंडिया होतेय सज्ज



# लक्ष्मीमाता कबड्डी संघाने पटकाविला श्री साई चषक



## विश्वविजेत्या भारतीय संघाचा गौरव

# शुभमन गिल छा गया! शतकी खेळीने दिग्गजांना टाकले मागे



# कर्णधार हार्दिक पांड्याची खिलाडूवृत्ती पृथ्वी शॉच्या हातात सुपूर्द केली ट्रॉफी




# टी-२० वर्ल्डकपच्या विजयाचा शिल्पकार जोगिंदर शर्मा निवृत्त



## बिग बॅश लीगमध्ये थर्ड अंपायरच्या निर्णयाने धक्का

# धोनीचा नवा लूक व्हायरल



जीवेत् शरदः शतम्।

महेश मांजरेकर

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

रवींद्र गावंड